MAHMAR 19358/13/1/2000-SC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ६ / जून २०१२

## संपादकीय

### ऑलिम्पिकच्या चुलीत चर्चेची लाकडे

जागतिक क्रीडाविश्वामध्ये सद्या सगळ्यांचे लक्ष लागलेला विषय म्हणजे, ऑलिम्पिक स्पर्धा. २७ जुलै २०१२ ला सुरू होणाऱ्या, दर चार वर्षांनी भरविल्या जाणाऱ्या या जागतिक स्पर्धा भारताच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. १९४८ साली लंडनला झालेल्या 'तिहेरी उडी' स्पर्धेत भारताच्या हेन्री रिबेलो यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता. त्याचवर्षी खाशाबा दादासाहेब जाधव यांनीही फ्री स्टाईल कुस्तीत सहावा क्रमांक मिळवला होता.

"खेळांच्या आधारे शारीरिक व नैतिक गुणविशेषांचा विकास करणे व जगातील सर्व उत्तम खेळाडूंना दर चार वर्षांनी स्पर्धांच्या निमित्ताने एकत्र आणणे" या उद्देशाने ऑलिम्पिक स्पर्धा सुरू झाल्या. इसवीसनापूर्वी पासूनचा इतिहास या स्पर्धांना आहे. पण मधली दोन सहस्रके स्पर्धांशिवाय गेली. कोणत्याही चांगल्या कामाच्या संघटनासाठी उत्तम संघटक असावा लागतो. बॅरन पियर द कुबर्तिन च्या रूपाने असा चांगला संघटक या खेळांना मिळाला व १८९४ साली ग्रीसची राजधानी असलेल्या; तसेच प्राचीन ग्रीकचा वारसा असलेल्या पॅरिस येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती स्थापन करण्यात आली. कुबर्तिनने सुमारे ३० वर्षे या समितीचे अध्यक्षपद भूषवले होते.

ऑलिम्पिक या विषयावर, त्यांतील सहभागी खेळाडूंवर, खेळांवर, जगात सर्व भाषांमध्ये अगणित साहित्य निर्माण झाले आहे व होत आहे. या विषयाच्या संबंधातील संकेतस्थळेही आंतरजालावर उपलब्ध आहेत. राजकारण हा मानवी समूहाचा अविभाज्य भाग असल्याने या स्पर्धांमध्ये झालेली राजकारणे व त्यांचे किस्से अशा प्रकारचे साहित्यही जाभर वाचले जाते. १९०८ मध्ये पेनसिल्वानियाच्या बिशपने केलेले बोधवाक्य ऑलिम्पिक समितीने स्वीकारले ते बोधवाक्य असे आहे, "जिंकणे ही जीवनातील आवश्यक गोष्ट नाही," आवश्यक आहे ते "चांगली लढत देणे." ऑलिम्पिकचे ब्रीदही 'आधिक वेगवान' 'अधिक उंच' आणि 'अधिक बलिष्ठ' हे आहे. ऑलिम्पिकचे शुभचिन्ह १९७२ च्या जर्मनीमध्ये झालेल्या शुभचिन्ह तयार करण्याच्या प्रथेनुसार ऑलिम्पिक समितीने दरवर्षी बनवायचे ठरवले. बऱ्याचदा हे चिन्ह प्राण्याच्या चित्र स्वरूपात असते.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

ऑलिम्पिकची ही सर्व प्राथमिक माहिती देण्याचे कारण म्हणजे भारतीय माणसाला साईना नेहवाल, विश्वनाथन आनंद, कर्णम मल्लेश्वरी, अंजली वेदपाठक (भागवत) ही नावे विचारली तर गोंधळायला होते. ऑलिम्पिकमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करणारे हे खेळाडू कोणत्या खेळांशी निगडित आहेत हे ही भारतीय माणसाला सांगता येत नाही. ही व अशी नावे महत्त्वाची आहेत का, का महत्त्वाची आहेत, देशाच्या क्रीडाविश्वाच्या नकाशात यांचे योगदान कोणते, यांपैकी आम्ही काहीही दाखवू शकत नाही याचे कारण क्रीडाक्षेत्राशी आमचा संबंध शाळा महाविद्यालयांत त्या खेळात भाग घेणे आणि दूरदर्शनावर चोवीस तास वाहणाऱ्या वाहिनीतून दिसणाऱ्या क्रिकेट सामन्यांपुरता मर्यादित असतो. मैदाने ही युवा पिढीची फुप्फुसे आहेत हे आम्हांला पटतच नाही. क्रिकेटमधील सर्व बारकावे, सर्व घटना यांवर अधिकार नसला तरी आम्ही तोंडभरून टीका करतो. जणूकाही क्रिकेट हा आमचा राष्ट्रीय खेळ आहे आणि तो आमचा वारसा आहे असे सर्व वातावरण आहे. क्रिकेट बद्दल एवढे 'प्रेम' असण्याचे खरे कारण आमची इंग्रजाळलेली 'साहेबी' वृत्ती हे आहे. त्याच प्रमाणे खेळाडूंना मिळणारा पैसा, त्यांच्यामुळे निर्माण होणारे वलय याचे सुप्त आकर्षण आमच्या मनात असते हे ही आहे.

थोडे मागे वळून पहाता, ऑलिम्पिकच्या नकाशात आम्ही कोठे आहोत? लहान लहान देशही अनेक पदके मिळवतात; पण आमचा खंडप्राय देश मागे आहे, तो का? आमच्या खेळाडूंमध्ये गुणवत्ता नाही का? त्यांच्यावर पुरेसे कष्ट घेतले जात नाहीत का? हे आणि असे प्रश्न १९ जुलै ते १२ ऑगस्ट पर्यंत सगळ्याच वर्तमानपत्रांमध्ये चर्चिले जातील. 'ये रे माझ्या मागल्या' प्रमाणे ही वर्तमानपत्रे रद्दीतही जातील; पण पुढील चार वर्षांचे नियोजन, त्यासाठी घ्यावयाची काळजी, ही दृष्टी कोणाहीकडे नसेल. वास्तविक गेल्या चार स्पर्धांमध्ये तक्त्यांच्या यादीत भारताचे नाव आहे. ऑलिम्पिकच्या प्रशस्त क्रीडाप्रेक्षागृहात आमचे राष्ट्रगीत वाजवले गेले. बिजींगचे ऑलिम्पिक तर सुवर्णाक्षरांनी लिहावे इतके उत्तम ठरले. इतकी स्वर्णकामगिरी आमच्या अभिनव बिंद्राने केली.

'हॉकी' हा आमचा राष्ट्रीय खेळ आहे. १९७२ च्या सुमारास ऑलिम्पिकने त्यांच्या खेळांच्या यादीत हॉकीला स्थान दिले तेव्हापासून अनेक ऑलिम्पिक सामने आम्ही गाजवले. सुवर्णपदकापर्यंत यश गाठलेल्या या खेळाकडून भारताला खूप अपेक्षा आहेत. १९८० च्या मास्को ऑलिम्पिकमध्ये आठव्या सुवर्णपदकावर भारताला समाधान मानावे लागले होते. अर्थात, स्पर्धा आहे चो असणारच आहे. पाकिस्तान, इंग्लंड, चीन, या देशांची हॉकीतील मेहनत आणि त्यांनी घेतलेले कष्ट यांचा विचार क्षणभरही आम्हांला डोळ्यांआड करता येणार नाही. जी गत हॉकीची आहे तीच नेमबाजी, टेबलटेनिस, जलतरण आणि स्पर्धांमधील आमच्या इतर सहभागाची असणार आहे.

आमच्या खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर सकस आहारही मिळताना मारामार! योग्य प्रकारे काळजी घेणारे क्रीडा प्रशिक्षक त्यांना मिळायला हवेत. इतर सर्व सुविधा त्यांना लाल फितीच्या स्पर्शाशिवाय मिळाल्या पाहिजेत. असे झाले, तरच इतिहास घडू शकेल. एक पाऊल जरी पुढे पडले तरी खूप काही साधले असे म्हणता येईल.

१९ जुलै ते १२ ऑगस्ट या काळात जगातही ऑलिम्पिकचे वारे वाहतील; पण १३ ऑगस्टला ऑलिम्पिकचे साहित्य रद्दीत विकल्यावर आम्ही स्वत:ला मात्र 'ट्वेंटी-२०' च्या विश्वकरंडक या विषयाच्या चर्चेत, दारू मध्ये बुडावे, तसे बुडवून घेतले नाही म्हणजे झाले!!

**- मोहन पाठक**

●●●



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक ६ / जून २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक १२ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | माझी जन्मठेप | आदित्य जोशी | ३ |
| ३) | तयाचा वेलु गेला गगनावरी | श्री. मोहन पाठक | ६ |
| ४) | अग्नी आणि सोम | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ९ |
| ५) | होहोटमधील पंचपगोड्याला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | १३ |
| ६) | संघर्ष हेच जीवन, आत्महत्या नव्हे ! | कु. सविता रमेश घुगरे | १५ |
| ७) | स्वामी रामतीर्थ | श्री. शं. बा. मठ | १७ |
| ८) | नवीन मराठी सायबर म्हणी | श्री. चंद्रकांत शिंगाडे | २२ |
| ९) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | असीम | २३ |
| १०) | माहितीचा अधिकार | प्राजक्ता दिलीप राणे | २४ |
| ११) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २६ |
| १२) | डॉ. सौ. मानसी देशमुख यांची मुलाखत | सौ. प्रणाली सोहोनी | ३३ |
| १३) | परिसर वार्ता | - संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

- संपादक

# माझी जन्मठेप

*वि. दा. सावरकरांच्या संदर्भातील स्पर्धेत यशस्वी ठरलेले लेख देत आहोत. त्या संदर्भात त्यांच्या 'माझी जन्मठेप' या पुस्तकावरील हा लेख – संपादक*

क्रांतीकारकाचे सेनापती स्वातंत्र्यसैनिकांचे अग्रणी, हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्त्वज्ञ व सक्रिय हिंदू संघटक आणि क्रियाशील धर्मसुधारक व समाजसुधारक, प्रेरणादायी महाकवी आणि विज्ञाननिष्ठ व राष्ट्राची शस्त्रसज्जता याबाबत प्रखर विचार मांडणारे विचारवंत! अशा शब्दांत स्वातंत्र्यवीर या महान व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करता येईल.



महाराष्ट्रात नाशिकजवळच्या भगूर गावी विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी झाला. तीव्र बुद्धिमत्ता, आक्रमी व साहसी वृत्ती, हृदयातील मानव्य अन् सर्जनशील कवित्व लाभलेले हे बालक वयाच्या दहाव्या वर्षीच इतिहास आणि धर्मशास्त्रावरील जाडजूड पुस्तके वाचू लागले. तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. चाफेकर बंधूंना फाशी दिल्याचे समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे सशस्त्र क्रांतीची शपथ घेऊन देशासाठी अखेरपर्यंत झुंजण्याचा निश्चय केला.

तरुण वयात सावरकरांनी अनेक संघटना स्थापन करून समाजबांधणी करण्यात मोलाचा वाटा उचलला व तरुण पिढीमध्ये देशाभिमान जागृत केला. पुण्यामध्ये विदेशी कपड्यांची होळी केली व त्यातून लोकांना स्वदेशीचा संदेश दिला.

सन १९०६ साली उच्च शिक्षणसाठी ते लंडनला गेले. तेथे बॅरिस्टर पदवी मिळविली. इंग्लंडमधील वास्तव्यातच त्यांनी अनेक क्रांतिकारी योजना आखल्या. बॉम्ब तयार करण्याची माहिती मिळवली. व ही माहिती तसेच पिस्तुले पुस्तकांमध्ये लपवून भारतातील क्रांतिकारकांपर्यंत पोहचवली.

आपल्या ओघवत्या वाणीने इंग्लंड व भारतातील क्रांतिकारकांना झपाटून टाकले. ब्रिटीश सरकारला या सर्व प्रयत्नांचा सुगावा लागला होता. त्यामुळे त्यांना इंग्लंडमधे अटक करून सागरी मार्गाने भारतात आणायचे ठरले. परंतु ती बोट फ्रान्सच्या मार्सेलीसच्या बंदराजवळून जात असताना सावरकरांनी बोटीतून उडी मारून फ्रान्सचा किनारा पोहत गाठण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने त्यांना त्यात अपयश आले. त्यामुळे सावरकरांवर १९१०/११ मधे दोन खटले इंग्रज सरकारने चालविले व सावरकरांना दोन जन्मठेप, काळ्यापाण्याची शिक्षा सुनावण्यात आली. या शिक्षेचा अर्थ होता अंदमानात पन्नास वर्षे सक्तमजुरी. उभ्या आयुष्याची राखरांगोळी!

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जागी दुसरा कोणी सर्वसामान्य माणूस असता तर त्याने निश्चितच हाय खाल्ली असती. परंतु सावरकर मूर्तिमंत धैर्याचे महामेरू। त्यामुळे त्यांनी ही शिक्षा स्थितप्रज्ञ वृत्तीने स्वीकारली.

---

दुसऱ्यांच्या चुकांमधून जे काही शिकता येईल, ते शिकून घ्या. कदाचित तुम्हांला तुमच्या चुकांच्यावेळी तशी संधी मिळणार नाही. – आल्फ्रेड शीनवोल्ड

सावरकरांना २४ डिसेंबर १९१० रोजी पहिली जन्मठेपेची शिक्षा व २० जानेवारी १९११ रोजी दुसरी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना २७ जून १९११ रोजी अंदमानात जाण्यासाठी 'महाराजा' नौकेवर चढविले व ४ जुलै १९११ रोजी त्यांचा अंदमानच्या कारागृहात प्रवेश झाला. तेथे त्यांना अनेक हालअपेष्टा, कष्ट व माणुसकीला काळिमा फासेल अशा प्रकारच्या छळांना सामोरे जावे लागले. आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्याच्या त्यांच्या निश्चयामुळेच व तिच्यावरील अपरंपार प्रेमामुळे ते हे दिव्य पार करू शकले. सतत अकरा वर्षे असा छळ इंग्रज सरकारच्या उद्दाम तुरुंग अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्याकडून केला गेला. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या उत्तम वागणुकीमुळे व काही अटी मान्य केल्यानंतर त्यांची अंदमानच्या तुरुंगातून २ मे १९२४ रोजी सुटका करण्यात आली.

अशा या अंदमानच्या कारागृहातील वास्तव्याचे अत्यंत विदारक अनुभवांचे वर्णन स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकात केले आहे.

या पुस्तकात अंदमानातील कैदी जीवन, क्रूर, शिक्षा, तुरुंगधिकारी व त्यांचे सहकारी यांनी तेथील इतर कैद्यांचा व सावरकरांचा केलेला अनन्वित छळ, याचे वर्णन आहे. तसेच, तेथील वास्तव्यात सावरकरांचे आचार, विचार व त्यांचा मायभूमीच्या स्वातंत्र्याचा खंबीर मनोनिग्रह आपल्याला हेलावून टाकतो. अंदमान तुरुंगात रक्त ओकायला येईपर्यंत स्वातंत्र्यवीरांना शिक्षा दिल्या जात. त्यांना मुलभूत गरजा पुरविल्या जात नसत. प्रसंगी जेवणात अळ्या, किडे, साप येत. त्यांना उभ्या बेडीत आठ-आठ दिवस उभे केले जात असे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वडील बंधूंना त्यांना त्याच कारागृहात असून भेटता आले नाही. सावरकरांना कोलूला जुंपण्यात आले. ही कोलूची शिक्षा भयानक होती. प्राण्यासारखे माणसाला जुंपून नारळापासून तेल काढण्याचे काम दिले जाई. दिवसभरात ठरावीक लिटर तेल काढण्याची सक्ती केली जात असे. आजारी असतानाही तशाच स्थितीत कोलूला जुंपले जात असे.

त्यांच्याबरोबर शिक्षा भोगणाऱ्या अनेक कैद्यांचे त्या हालअपेष्टा सहन न होऊन मृत्यू ओढवले. त्यांची मृत्यूनेच त्या हालअपेष्टांतून सुटका केली.

त्यांनी या पुस्तकात वर्णन केलेले अनुभव वाचताना क्षणोक्षणी मन विव्हळ होते, व स्वातंत्र्यवीर सावरकर व त्यांच्याबरोबर असलेले अनेक राजकीय कैदी यांच्याबद्दल मन आदराने भरून येते. त्यामुळे हा ग्रंथ केवळ अंदमानातील हालअपेष्टांचे चित्र आपल्यासमोर उभे करत नाही, तर ज्या स्वातंत्र्यासाठी असंख्य वीरांनी हे कष्ट सोसले, ते आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची आपल्याला प्रेरणा देतात.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सावरकरांनी लिहिलेले मनोगत आपल्याला अंतर्मुख करते. ते लिहितात, आम्ही सुटून आल्यावर महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजारो देशबांधवांनी सहानुभूतिपूर्ण औत्सुक्य अनेक समयी व्यक्त केले व माझे अनुभव व्यक्त करण्याची गळ घातली, परंतु काही केल्या अंदमानची कथा ओठापर्यंत येऊन बाहेर येईना, वाटे सांगण्यासाठी का ते सर्व भोगिले! तर मग अंदमानचा अनुभव हा अभिनयच म्हणावयाचा! त्यांच्या मते त्यांच्याबरोबर तशाच शिक्षा भोगून जे त्यांचे सहकैदी त्या यातनांना बळी पडले, त्यांना त्यांच्या प्रियजनांना त्यांनी भोगलेली दु:खे सांगण्याचा अवसर मिळाला नाही. त्यांना सोडून आपण आपल्या दु:खाचे वर्णन करणे, म्हणजे त्यांच्याशी प्रतारणा होईल.

यावरून सावरकरांचे मन किती विशाल व संवेदनशील होते याचाच प्रत्यय येतो. असेच अपरंपार कष्ट सहन करत असतानाच सावरकरांनी आपल्या संपन्न प्रतिभेतून अनेक

काव्ये साकारली. तुरुंगाच्या भिंतीच त्यांचे कागद बनले. व बोरुचा काटा लेखणी बनली त्यातून 'कमला' हे काव्य साकारले. बोरुच्या काट्याने भिंतीवर ओळी लिहून ते त्या मुखोद्गत करत व परत त्या मिटवून पुढच्या ओळी लिहीत.

हे पुस्तक मराठी साहित्यनिर्मितीतील अजरामर ठेवा आहे. त्यातील निवेदन पूर्णपणे प्रथम पुरुषात आहे, त्यामुळे पुस्तक वाचताना पूर्णपणे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या व्यक्तिरेखेशी एकरुप होतो व त्यात गुंगून जातो. क्षणोक्षणी मन उदास होते व त्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे उदात्त योगदान दिले त्याच्या जाणीवेने मन भरून जाते. आपण या स्वतंत्र भारतात केवळ अशा अनेक वीरांच्या बलिदानामुळेच मुक्तपणे जगू शकतो.

माझी जन्मठेप हे पुस्तक पिढ्यान पिढ्या प्रेरणादायी ठेल असा माझा ठाम विश्वास आहे.

आदित्य जोशी
सरस्वती इंग्रजी माध्यम
९ वी ड - ठाणे

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

## कबुतरांचे दिशाज्ञान

कबुतरे अनेक मैल अंतरापर्यंत उडत जाऊन 'टपाल' पोचवण्यात वाकबगार आहेत हे आपल्याला माहीत आहेच. त्यांच्या शरीरात निसर्गत: एक जैविक पृथ्वीय स्थितिदर्शक व्यवस्था असते.

टेक्सासच्या ह्यूस्टन येथील बेलोर महाविद्यालयातील संशोधक डेव्हिड डिक्नन व लीक्वलींग वू यांनी घरापर्यंत येणाऱ्या (कोलंबिया वायव्हा) सात कबुतरांचा विशेष अभ्यास केला. त्यांनी या कबुतरांच्या मेंदूमध्ये विशिष्ट विद्युत घटाचा ध्रुव (इलेक्ट्रोड) घातला व प्रत्येक मज्जातंतूची हालचाल नोंदली.

नंतर या पक्षांना चुंबकीय क्षेत्रात ठेवून त्यांच्या मज्जतंतूची हालचाल व चुंबकाची तीव्रता जुळवून घेतली. या संशोधनात त्यांना असे आढळले की, मज्जाततूंच्या विशिष्ट भागातील ५३ मज्जातंतू कार्यरत होते. हे मज्जातंतू बहुधा मेंदूच्या आतील भागाशी जोडले असता ते जैविक दिशादर्शकाचे काम करतात असा त्यांचा प्राथमिक अंदाज आहे.

- संदर्भ 'न्यू सायंटिस्ट'
५ मे २०१२ - पृ. १५

तुम्ही ज्या मार्गावरून जात आहात; त्या प्रवासात एकही समस्या येत नसेल तर, तुम्ही चुकीच्या मार्गावर आहात हे नक्की समजा. - स्वामी विवेकानंद

# तयाचा वेलु गेला गगनावरी

*दि ८ मे २०१२ रोजी दिशा मासिकासंदर्भात कार्यकारी संपादक श्री. मोहन पाठक यांची आकाशवाणीच्या साहित्य सौरभ कार्यक्रमात अक्षय दांडेकर यांनी मुलाखत घेतली. रेडिओवर ऐकता आली नाही, अशांसाठी मूळ टिपणाचा लेखसुद्धा येथे देत आहोत. ही मुलाखत १२ मिनिटांची होती त्यामुळे मूळ टिपणात काही बदल केले आहेत.*

विद्या प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना १९३५ सालची. १९५५ - ५६ च्या सुमारास डॉ. वा. ना. बेडेकर व त्यांचे सहकारी यांनी अनेक अडचणींना सामोरे जाणाऱ्या या संस्थेचे नेतृत्व स्वीकारले. त्यानंतर खूप वेगाने संस्थेची प्रगती होत गेली. डॉ. बेडेकर मराठी शाळा, कै. सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा, के. ग. जोशी कला महाविद्यालय, ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, अशा अनेक शिक्षण संस्था काळाच्या ओघात निर्माण झाल्या. त्यांच्या इमारतींचे संकुल तयार झाले. आज ठाणे महाविद्यालय परिसर या नावाने ठाणेकर हे संकुल ओळखतात. विधी महाविद्यालय, तंत्र निकेतन, व्यवस्थापन अशा संस्था एखादा गुलमोहर फुलावा तशा महाविद्यालय परिसरात फुलत गेल्या. आता कोकणात चिपळूणजवळ वेळणेश्वर इथे स्वतंत्र अभियांत्रिकी महाविद्यालय अनेक इमारतींत उभे रहात आहे.




'तयाचा वेलु गेला गगनावरी' (दोन आवृत्या) या पुस्तकात या संस्थेच्या सर्वांगीण इतिहासाची नोंद आहे. अशा प्रकारे पुस्तक रूपाने शब्दबद्ध करावे ही माझी कल्पना. अगदी अलीकडे व्यवस्थापन अभ्यासक्रमाची लंडन शाखाही सुरू झाली आहे.

डॉ. विजय बेडेकर, श्री. मा. ना. पाटील, श्री. श्री. वि. करंदीकर अशा अनुभवी कार्यकर्त्यांची अव्याहत धडपड म्हणजे वि. प्र. मं. मा. य. गोखले, उत्तम जोशी यांच्या सारखे सामाजिक क्षेत्राचा अनुभव असणारे कार्यकर्ते संस्थेसाठी अहर्निश धडपडत असतात.

अशा या संस्थेचे 'दिशा' हे मासिक जुलै ९६ मध्ये सुरू झाले. 'व्ही. पी. एम. दिशा' या नावाने पंजीकृत नियतकालिक काढणे हे अवघडच काम होते. सुरुवातीची काही वर्षे प्रकाश वैद्य यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले. त्यानंतरची गेली पंधरा सोळा वर्षे डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मी कार्यकारी संपादक म्हणून काम करत आहे.

शैक्षणिक संस्थेचे अशा प्रकारचे मासिक हा दुर्मीळ अनुभव आहे. समाजाचे प्रबोधन करण्यासाठी मंडळाने हे वैचारिक व्यासपीठ उभे करून दिले आहे. आपल्या संस्थेचे असे मासिक असावे, ही डॉक्टरांची कल्पना. वि. प्र. मं. शिवाय महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतातही प्रत्यक्षात असे

मासिक असल्याची कुठे नोंद नाही. करमणूक प्रधान मासिके, मराठी इंग्रजीमध्ये खूप निघतात. परंतु सामाजिक तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांच्यावर भर देणारी 'दिशा' सारखी मासिके हा अपवाद आहे.

आमच्या या मासिकाची अनेक खास वैशिष्ट्ये आहेत. त्यांतील एक म्हणजे संत साहित्य आणि संस्कृतचा गाढा व्यासंग असणारे शंकरराव मठ यांचे लेख. तसेच संस्कृती ही संकल्पना, तिची प्रतिकृती व तिची साधना या संदर्भात गेली अनेक वर्षे श्री. यशवंतराव साने यांचे व्यासंग परिपूर्ण लेख प्रकाशित होत असतात. श्रीमती आशा भिडे यांनी दर अंकात एक, या प्रमाणे गीतेच्या अठरा अध्यायांवर केलेले लेखन 'सांगे गीता' या नावाने ग्रंथ रूपाने प्रकाशित झाले.

डॉ. सुधाकर आगरकर यांचे परदेश प्रवासावरील लेख केवळ वाचनीयच नव्हे तर दर्शनीय ही असतात. ते लेख वाचताना आपण प्रत्यक्षात त्या ठिकाणी गेलो आहोत व तो अनुभव घेत आहोत, याचा प्रत्यय येतो. डॉ. आगरकरांच्या लेखांचेही लवकरच पुस्तक येत आहे.

शंकरराव मठ यांनी वेद, पुराणे, भारतीय संस्कृतीची अन्य काही अंगे या सर्वांबरोबर मराठी संतावरील लेखमालाही लिहीली. संतांच्या लेखमालेतील लेख त्यांनी पुस्तकरूपाने प्रकाशित केले आहेत.

मराठी नियतकालिकांमध्ये वार्षिक सूची देण्याची प्रथा आता जवळ जवळ कालबाह्य ठरत आहे. या पार्श्वभूमीवर 'दिशा' मध्ये आम्ही वार्षिक सूची देतो हे आवर्जून नोंदवावेसे वाटते. 'दिशाचे हितचिंतक श्री. सचिन गराटे हे काम अत्यंत तळमळीने करतात. सूचीमुळे दिशाची संदर्भ क्षमता खूप वाढली आहे.

रूपारेल महाविद्यालयाचे व्यासंगी ग्रंथपाल व ठाण्याचे रहिवासी डॉ. प्रदीप कर्णिक यांनी प्रसंगोपात केलेले लेखन अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी डॉ. महेश केळुसकरांची सूची दिशासाठी तयार केली. श्रीनिवास आठल्ये, ग्रंथप्रसारक श्री. शरद जोशी, सौ. सुनीता गुणपुले अशा अनेक लेखकांची नावे विशेषत्वाने नमूद करावी लागतील. श्री. अरविंद घोष यांच्यावरील अभ्यासातून 'दिशा' मधून लिहिते झालेले श्री. नरेंद्र नाडकर्णी यांनी आपल्या विचार प्रवृत्त करणाऱ्या लेखांचे दिशासाठी योगदान दिले आहे.

दिशाचे विशेष आकर्षण म्हणजे समकालीन घटनांवर लिहिलेले संपादकीय हे होय. या संपादकीयांमध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक ऐतिहासिक राजकीय अशा सर्व विषयांची चर्चा येते. दिशा वाचणाऱ्या अनेक वाचकांचा संपादकीय अतिशय भावले असा अभिप्राय अंक आल्यावर आम्हांला अनेकांकडून मिळतो. भ्रष्टाचार, स्वार्थीपणा इत्यादी समस्यांनी समाज त्रस्त झाला आहे व यातून बाहेर पडायचे असेल तर काय करायला हवे याचा मार्ग अग्रलेखांमध्ये सुचवला जातो. दिशाचे सुरुवातीचे अग्रलेख हे प्राच्य विद्येशी संबंधित होते. गेली काही वर्षे मात्र सामाजिक समस्या आणि त्यावर केलेली टीका हे अग्रलेखांचे वैशिष्ट्य आहे.

मंडळाच्या अनेक घटक संस्थांमध्ये सातत्याने खूप कार्यक्रम होत असतात. परिषदा, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम या सर्वांचा तपशीलवार वृत्तांत परिसर वार्ता या सदरातून आम्ही देतो त्यामुळे या कार्यक्रमांचा तपशील तर नोंदला जातोच पण अनेक जण करत असलेल्या कामाची दखल घेतली जाते यासाठी घटक संस्था त्यांच्याकडे होणाऱ्या कार्यक्रमांचे वृत्तांत दिशाला देतात.

दिशाचा हा अंक आम्ही पालकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करतोच पण अनेक वर्गणीदार, देणगीदार, शैक्षणिक संस्था महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत या सर्वांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असतो. शैक्षणिक संस्थेने

---

सत्य आणि न्याय हे लहान आणि मोठ्यांसाठी वेगळे कधीच नसते, पुष्कळदा त्यासाठी वाट पहावी लागते इतकेच - अल्बर्ट आइनस्टाइन

वैचारिक व्यासपीठ या स्वरूपाचे मासिक काढावे आणि इतकी वर्षे सातत्याने त्याचा दर्जा सांभाळत वाचकांपर्यंत ते घेऊन जावे ही घटना आजच्या काळात तरी लक्षणीय व अपवादात्मक आहे. दिशाच्या संदर्भात अधिक जाणून घेणे किंवा २५० रु. वार्षिक वर्गणी पाठवणे यासाठी विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा ठाणे ४००६०२ या पत्यावर किंवा २५४२६५७० या दूरध्वनीवर संपर्क साधावा ही अपेक्षा! दिशाचे सर्व जुने अंक vpmthane.org या संकेतस्थळावर दिशा या नावाचे बटण (जोडणी) दाबून पाहता येतात.

---

या मुलाखतीची CD साठी वि. प्र. मंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

– मोहन पाठक

●●●

### व्हॅनगॉग चे वास्तव्य

लंडनमध्ये व्हॅन गॉग जेथे रहात होता ती जागा एका चिनी उद्योगपतीने भेट देणाऱ्या कलाकारांसाठी एक स्टुडिओ म्हणून विकत घेतली. हा नवीन मालक जेम्स चँग एका गुंतवणूक व व्यापार कंपनीचा संचालक असून तिचे नाव एल्य लेन इंटरनॅशनल असे आहे. ही कंपनी चेंगडू येथे स्थित आहे. २७ मार्चला झालेल्या लिलावात ५,६९०,०० पौंड या किंमतीला ही जागा त्याने घेतली. व्हॅन गॉग याच्या या वास्तूत सर्वात वरच्या मजल्यावर १८७३ ते १८७४ या काळात त्याचा शयनकक्ष होता. तरुण असणारा हा कलाकार त्या संपत्तीच्या मालकीणीच्या मुलीच्या प्रेमात होता; पण तिने त्याला नकारले.

(संदर्भ – द आर्ट न्यूज पेपर क्र. २३५ मे २०१२ पृ. ७)

### चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी, खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वतःला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने,
स्वतःला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व स्वतःचा उद्धार आहे.

# अग्नी आणि सोम

*अग्नी आणि सोम यांचा वेदांना अभिप्रेत असणारा अर्थ या विषयाचे या लेखात विवेचन आले आहे.*

'सिक्रेटस् ऑफ दि वेदाज्' या ग्रंथामध्ये योगी श्रीअरविंद आपली खात्री पटवून देतात की वेदकाळामध्ये आर्य ऋषी जो यज्ञविधी करत असत; त्या विधीच्या मागे एक अत्यंत शिस्तबद्ध अशी मानसशास्त्रीय प्रक्रिया होती. यज्ञविधी करणाऱ्या दीक्षिताची आध्यत्मिक प्रगती व्हावी हा त्या विधीचा आणि त्यामागील प्रक्रियेचा मुख्य हेतू होता. या ठिकाणी फक्त दीक्षा घेतलेल्या व्यक्तीसच हा यज्ञ करता येत असे, जे सूचित केले आहे त्याचे कारण त्या काळी आजच्या प्रमाणेच संपूर्ण समाज वरच्या स्तरावर गेलेला नव्हता आणि त्यामुळे अशा प्रकारची शिस्तबद्ध मानसशास्त्रीय प्रक्रिया ज्यांना आकलन होऊ शकेल आणि त्याप्रमाणे ज्यांना ती प्रत्यक्षात आणता येईल, अशा व्यक्तींनाच ती दीक्षा दिली जात असे. आणि म्हणूनच ऋषींना आलेल्या आध्यात्मिक अनुभवांची तत्त्वप्रणाली वेदमंत्रातून मांडताना द्व्यर्थी भाषेचा अवलंब करण्यात आला. बाह्य अर्थाच्या मागे दडलेला गूढ अर्थ फक्त सिद्धयोग्यांना आणि त्यांच्याकडून दीक्षा घेण्यास पात्र असलेल्यानाच समजत असे.

अशा रीतीने यज्ञ म्हणजे काय तर एखादे यज्ञकुंड तयार करून त्यात प्रज्वलित केलेल्या अग्नीमध्ये समिधा, तूप वगैरे सोडून चालू असलेली हवनाची प्रक्रिया असे जरी सर्वसाधारणपणे मानण्यात येत असले; तरी यज्ञ म्हणजे दीक्षितांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी चालणारी एक शिस्तबद्ध अशी मनोवैज्ञानिक प्रक्रिया. यज्ञाची प्रगती म्हणजे आध्यात्मिक प्रयत्नांतील प्रगती. " The whole process of the universe, says shri Aurobindo, is in its very nature a sacrifice, voluntary or involuntary. Self - fulfilment by self-immolation, to grow by giving is the universal law."

वेदकाळातील यज्ञामध्ये ज्या देवतांचा उल्लेख येतो त्या देवता प्रत्यक्षात साधकास आध्यात्मिक मार्गात सहाय्य करणाऱ्या देवता होत. कांही विशिष्ट अशा मनोवैज्ञानिक कार्यांचे आधिपत्य त्या देवतांकडे असल्याने त्यांची प्रार्थना केली जात असे. अग्नी, सोम, इन्द्र आणि वरुण या त्या देवता होत. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून तेव्हां आणि आजही या निसर्गदेवता म्हणून मानल्या गेल्या असल्या तरी सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या त्या विशिष्ट प्रकारच्या शक्ती आहेत. याची जाणीव फक्त दीक्षितानांच होत असे. अशा या देवतांपैकी अग्नी व सोम या दोन देवतांचा यज्ञविधीमध्ये फार महत्त्वाचा कार्यभाग होता.

**अग्नी :**

वेदांमध्ये अग्नीला जातवेद म्हटले आहे. याचा अर्थ जे जे निर्माण झाले आहे त्याचे ज्ञान असणारा. त्याचा उल्लेख 'पुरोहित', म्हणजे मुख्य पुजारी असाही केलेला आढळतो. ऋषी-मुनींच्या दृष्टिकोनातून तो यज्ञामधील 'होता', म्हणजे देवताना आमंत्रित करणारा असा आहे. तो 'साधु' म्हणजे पूर्णत्व साधणारा आहे, तसेच त्यास 'कवि -क्रातु' म्हणजे जबरदस्त स्फूर्तिस्थान असणारी द्रष्ट्याची इच्छाशक्ती असेही म्हटले आहे. अनेकदा त्याचा उल्लेख 'तनुनापात', म्हणजे शरीर व मन यापासून निर्माण झालेला असा केलेला असतो; तर कधी सहस: सुनु म्हणजे शक्तीपुत्र असाही केला जातो. परमेश्वराकडे जाणारा मानवाचा दूत म्हणून त्याची निवड केली आहे तर कधी तो

परमेश्वराचा दूत बनून येतो आणि मग तो मानवाचा अतिथी असतो. जेव्हा त्याचा उल्लेख 'पावक' म्हणजे शुद्ध करणारा असा केला जातो तेव्हां तो मानवामधील अशुद्धी नष्ट करून त्याला शुद्ध आणि पवित्र करतो. तो दानवांचे म्हणजे दुष्ट शक्तींचे, दुर्गुणांचे परिपत्यही करतो. अग्नी हा जरी मानवामध्ये जन्म घेऊन कधी त्याचा पुत्र तर कधी अतिथी होत असला तरी त्याचे खरे निवासस्थान सत्य, ऋत, सर्वश्रेष्ठ सत्य अथवा अनंत -चैतन्य हेच असते. या सत्याचा तो रक्षणकर्ता असतो. आणि मानवामध्ये असणाऱ्या चिरंतन सत्याच्या अंशाचे तो दुष्ट शक्तीपासून रक्षण करतो. अग्नी जेव्हा प्रज्वलित केला जातो तेव्हा एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्याची काळजी घ्यावी लागते. त्यानंतर मात्र तो मानवाचे पित्याप्रमाणे रक्षण करतो. रात्रंदिवस तो मानवाच्या उपयोगी पडतो. अग्नीचं अस्तित्व सर्वत्र असतं पण मानवाच्या अंतर्यामी तो 'त्रिता' असतो म्हणजे शारीरिक प्राणिक व मानसिक या तीन पातळ्यांवरचा लढवय्या असतो. उपनिषदातही अनेक ठिकाणी अग्नीचे महत्त्व सांगितलेले दिसते. इश उपनिषदही आपले भाष्य संपविताना अग्नीची प्रार्थना करून म्हणते - ''अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान्।'' हे देव अग्ने, सर्व अभिव्यक्त वस्तू तू जाणतोस, चांगल्या मार्गाने आम्हांस घेऊन जा आणि आनंदाच्या स्थानी पोहोचव.

अग्नीबद्दल ही सर्व माहिती घेतल्यावर आपल्यापुढे प्रश्न निर्माण होतो की अग्नी हे जर मनोवैज्ञानिक कार्य घडवून आणणाऱ्या शक्तीचं प्रतीक असेल तर ते कोणतं कार्य करतं? श्रीअरविंदांकडून आपल्याला समजतं, की अग्नी हे परमेश्वराच्या प्राप्तीसाठी आसुसलेल्या मानवी अभिप्सेचं प्रतीक आहे. वेद उपनिषदांत अग्नीला लावलेली निरनिराळी विशेषणे पाहिल्यावर अग्नी हे एक प्रतीक आहे हे आपण समजू शकतो. परंतु ही अभिप्सा म्हणजे मानवाची सामान्य इच्छाशक्ती नव्हे. ही इच्छाशक्ती किंवा अभिप्सा ही मानवाच्या अज्ञानरुपी अंध:काराच्या मागे एका पडद्याआड राहून कार्य करत असते, आणि स्वत:चे अस्तित्व जाणवून देण्यासाठी एका सुयोग्य वेळेची वाट पाहत असते. प्रथम ती एक छोटीशी ज्योत असते. मिचमिचणारी आणि भोवतालच्या वासनांच्या इच्छेमुळे निर्माण झालेल्या धुरकट वातावरणात निस्तेज ठरणारी. दैवी शक्तीचा प्रतिनिधी असणाऱ्या या दैवी पाहुण्याला लहान मुलाप्रमाणे सांभाळावा, वाढवावा लागतो. तेव्हा कुठे पूर्ण प्रदीप्त झाल्यावर तो आपल्या मानवी पित्याची काळजी घेऊ लागतो. केवळ मानवातच नव्हे तर हा अग्नी साऱ्या विश्वात कार्य करत असतो. श्री. अरविंद म्हणतात - "He is the divine will which, in all things, is always present is always destroying & constructing, always building and perfecting, Supporting, always the complex progression of the universe"

श्री. अरविंदांनी या ठिकाणी Complex Progression असा शब्द प्रयोग केला आहे कारण विश्वाची प्रगती ही नेहमीच चक्राकार गतीने चालू असते. कधी वर तर कधी खाली. शिवाय निर्मिती आणि नाश या ही गोष्टी आलटून पालटून घडत असतात. श्रद्धा आणि दृढ विश्वास असणाऱ्या या अभिप्सेला आपणास कोणत्या चिरंतन सत्याची तहान लागली आहे त्याची पूर्ण जाणीव असते. वासना आणि अहंकार यांपासून निर्माण झालेली मानवी जाणीवेतील अशुद्धी नाहीशी करणे हे तिच कार्य असते. जेव्हा ही प्रज्वलित होते तेव्हा 'होता' म्हणून कार्य करणाऱ्या अग्नीप्रमाणे ही सुद्धा दैवी शक्तीला निमंत्रित करते. आणि मानवी चेतनेचा त्या दैवी शक्तीशी संपर्क घडवून आणते. जेव्हा ती प्रदीप्त होते तेव्हा मानवी प्रगतीच्या आड येणारे सर्व अडथळे आणि दुष्ट शक्ती यांना नष्ट करते. मानवाच्या आरोहणात त्याला तिची सतत मदत होत असते. मात्र त्यासाठी मानवी चेतनेच्या तीनही स्तरांवर - शारीरिक, प्राणिक व मानसिक - तिला प्रज्वलित केल्यास संपूर्ण मानवी प्रकृतीला ती दैवी शक्तीच्या आधीन करते आणि मानवाचा परमेश्वराशी संपर्क घडवून आणते. या अग्नीला

आपल्या शक्तीने हे सारे अडथळे पार करावे लागतात. परंतु हे कार्य करताना बंडखोर अशी मानवी प्रकृती जेव्हा आपल्या अज्ञानामुळे आरोहणाच्या वृत्तीला प्रतिकार करते तेव्हा तिला या अवघड परिस्थितीशी सामना करावा लागतो. मात्र अशा प्रसंगी तिला जर सोमाची साथ मिळाली तर तिचे कार्य ती सहज पार पाडू शकते.

**सोम :**

सोम अथवा सोमरस म्हटल्यावर सर्वसाधारण माणसाला काय आठवतं? तर प्राचीन काळी ऋषी - मुनी एका विशिष्ट वनस्तीपासून काढलेला रस प्राशन करत असत. हा रस मधुर असून तो मानवाला धुंद करत असे. थोडक्यात, सोमरस म्हणजे एक मादक पेय अशी सर्वांची कल्पना असो. तर ऋषी त्याला सोमराज म्हणत आणि देवतेसमान मान देत. यज्ञविधिमध्ये इन्द्र, वरुण आदी देवतांना आकर्षित करण्यासाठी अग्नीच्या माध्यमातून सोमरस अर्पण केला जात असे. ऋग्वेदातील संपूर्ण ९ वे मंडल हे पवमान सोमावर आधारलेले आहे त्यावरून ऋषी मुनी सोमाला किती महत्त्व देत होते ते समजून येते. श्री अरविंदानी त्याचा उल्लेख " The Lord of delight & immortality" असा केला आहे.

आता ऋषी- मुनींनी त्याला कोणकोणती विशेषण लावली आहेत व त्यातून त्याची कोणती वैशिष्ट्ये स्पष्ट होतात ते पाहू. तो अग्नीप्रमाणेच 'तनुनापात' म्हणजे मानवी शरीरापासून निर्माण झालेल्या लहान मुलाप्रमाणे आहे. सूर्यदेवाची पुत्री सूर्या (शतपथ ब्राह्मणात तिला 'श्रद्धा' असे म्हणले आहे) ही त्याच्या जन्मवेळी मदत करून त्यास स्वच्छ व शुद्ध करते. जन्म होताच तो वाहू लागतो आणि परमेश्वरापर्यंत पोहोचतो किंवा स्वर्गापर्यंत घेऊन जाणारा परमानंदाचा सेतु बांधतो. तो 'वनस्पती' आहे म्हणजे 'Lord of Delight' आहे. कारण संस्कृतमधील 'वन' या शब्दाचा अर्थ जसा 'अरण्य' होता, तसाच 'परमानंद' म्हणूनही होतो आणि म्हणून त्याला 'Lord of Delight' या अर्थाने वनस्पती म्हणून संबोधलं गेलं पण जनसामान्यांनी त्याला एक 'झाड' मानलं. त्याचा प्रवाह अत्यंत मधुर आणि परमानंद देणारा असा असतो (पवस्व मदिष्ठया धारया: मध्व: धारया) त्याला अग्नीप्रमाणे 'सहस: सुनु:' म्हणजे शक्तीपुत्र असेही म्हणतात. तसेच दिव: शिशु: म्हणजे स्वर्गबालक आणि कवे: अपत्यम् म्हणजे द्रष्ट्याचा पुत्र असेही म्हणतात. तो जरी माधुर्याचा देव असला तरी धारदार शस्त्र घेऊन लढणारा शूर लढवय्या आहे ( ते भीमानि आयुधा तिग्मानि) आणि म्हणून त्याला 'वृत्रहन्तम्' असेही म्हणतात. वृत्र हा देव आणि मानवाचा शत्रू, मानवाच्या आध्यात्मिक प्रगतीस अडथळा आणणाऱ्या अथवा आंतरिक सत्य झाकोळून टाकणाऱ्या शक्ती म्हणजे वृत्र. तर असा हा सोम सोनेरी (हिरण्यय); पिवळसर तपकिरी (हरि) आणि लालसर (अरुष:) अशा रंगांचा असतो. तो त्याच्या पित्याला ज्ञान, शक्ती आणि संपत्ती मिळवून देतो. (पवस्व रयिम्, गोमन्तम्, अश्विनम्). तो येताना वीजांचा लखलखाट करत आणि वर्षाव करत येतो. स्फूर्तिदेवता भारती मही त्याच्याकडे येतात. विष्णुपुराण सांगते की तो पवमान सोम आहे आणि तो अग्नी व त्याची पत्नी स्वाहा यांचा पुत्र आहे. त्याचं वास्तव्य हृदयाच्या गुहेत खोलवर असतं हे संपूर्ण विवेचन वाचल्यावर आपणही अशा निष्कर्षाप्रत येऊन ठेपतो की सोम हा सुद्धा एक वेगळ्या प्रकारचा 'अग्नी' असावा. अतप्त तनु: न तद् आमो अश्नुते। त्याचं शरीर अग्नीनं तापत नाही त्याला सोमरसाचा आनंद घेता येत नाही. याचा अर्थ असा दिसतो की सोमरसाच्या कार्यासाठी आधी अग्नीला तयारी करावी लागते.

ऋग्वेदातील ही सर्व वर्णने वाचल्यावर आपल्या ध्यानात येऊ शकतं जी श्री अरविंद ज्याला Psychic being म्हणतात किंवा हृदयाच्या गुहेतील Psychic fire म्हणतात त्याच्याशी या सोमाचे साम्य आहे. ज्याला अभिप्सा म्हणतात तो अग्नी त्याच्या जन्मास मदत करतो

आणि 'श्रद्धा' त्याला जोपासते. जोपर्यंत अभिप्सा आणि 'श्रद्धा' मनाची आणि प्राणाची तयारी करत नाहीत तोपर्यंत तो बाहेर पडत नाही. तो हजर झाला कीं सर्वत्र माधुर्य आणि परमानंदाची निर्मिती होते. माताजींनी एकदा असं म्हंटलय की स्वर्गीय देवतानाही Psychic being चा अनुभव घ्यावासा वाटतो. हेच मानवी जीवनाचं वैशिष्ट्य आहे. या Psychic being मुळेच चेतनेच्या उच्चतर पातळ्यांची कवाडं उघडली जातात, आणि आध्यात्मिक शांती व आनंद प्राप्त होऊन ज्ञान आणि अलौकिक प्रतिभा यांचा प्रकाश पडतो. श्री अरविंद म्हणतात -

"the psychic is in direct touch with the Divine Truth. Aspiration, constant and sincere and the will to turn to the divine alone are the best means to bring forward the psychic"

पुढे ते म्हणतात की, psychic joining (higher conciousness) if effectual is much more powerful for the change of the whole being." आणि साधकांना या psychic being जो अनुभव येतो त्याबद्दल श्री. अरविंद म्हणतात - "A feeling of velvety softness within is a psychic experience & can be nothing else. Psychic plasticity which makes surrender possible along with a free openness to the Divine working from above" कथोपनिषद बहुधा याच Psychic fire चा अथवा सोमाचा उल्लेख करताना ''अंगुष्ठमात्र: पुरुषो ज्योतिरिव अधूमक: असे सांगून जाते. अंतर्यामी असणारा पुरुष अंगठ्याहून मोठा नाही. तो एखाद्या तळपत्या अग्नीसारखा आहे.

जर योगसाधनेचा उद्देश केवळ परमेश्वराशी एकरूप होण्याइतका मर्यादित नसेल आणि श्री अरविंदानी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण आंतरिक परिवर्तन हे ध्येय असेल तर त्या प्राप्तीसाठी केवळ अग्नीची शक्ती पुरेशी ठरणार नाही. कारण मानवाची शारीरिक, प्राणिक व मानसिक जाणीव परमेश्वराला शरण जाताना थोडासा तरी हातचा राखून ठेवते. आणि म्हणून या अवघड अशा कार्यात सोमरस अग्नीला मदत करतो. त्याचा मधूर आणि धुंद करणारा प्रभाव त्या मानवी घटकाना हवा हवासा वाटतो. उत्क्रान्तिच्या या झगड्यांत शरीर, मन व प्राणशक्ती यांना प्रत्येक गोष्ट पचवून वृद्धींगत होण्याची सवय झालेली असते. त्यामुळे हे मानवी घटक Psychic being लाही पचवण्याचा प्रयत्न करतात. पण हा शूर लढवय्या आपल्या गोड आणि धुंद करुन टाकणाऱ्या शक्तीने त्यांना नामोहरम करतो. हे मानवी घटक जेव्हा या झगड्यांत शरण जातात आणि समर्पण भावनेने त्यांची प्रगति होते तेव्हां त्याना जाणीव होते की त्यांचे अज्ञान आणि असमर्थता या ऐवजी आता त्याना ज्ञान, सामर्थ्य आणि चिरंतन आनंदाची प्राप्ती होत आहे.

***कै. विजय बोंडसे, श्री अरविंद आश्रम, पाँडिचेरी, यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा स्वैर अनुवाद.***

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपण शिकवत असलेल्या व शिकत असलेल्या विषयावर लेखन करणे हा समृद्ध करणारा अनुभव असतो तेव्हा आपणांकडून लेखन अपेक्षित आहे.**

**- संपादक**

# होहोटमधील पंचपगोड्याला भेट

*होहोट मधील भेटींबद्दल एक लेख यापूर्वी ही आला होता या लेखात तेथील भेटीची आणखी काही धावती चित्रे*

*- संपादक*

चीनची विज्ञान तंत्रज्ञान संघटना दरवर्षी चिनी विद्यार्थ्यांसाठी विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा आयोजित करते. या स्पर्धेत चीनमधील राज्यस्तरावरील विजेते सहभागी होतात. चीनच्या या राष्ट्रीय स्पर्धेत काही आंतरराष्ट्रीय प्रकल्पांचादेखील सहभाग असतो. संघटनेच्या निमंत्रणावरून मागील पाच वर्षांपासून भारतदेखील या स्पर्धेत सहभागी होत आहे. भारताच्या वतीने ठाण्यातील सौ. ए.के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थी आपला प्रकल्प घेऊन जात असतात.

२६ वी नवनिर्मिती स्पर्धा होहोट या शहरात ऑगस्ट ३ ते ६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. चीनच्या उत्तर पूर्व भागांत असलेल्या मंगोलिया (Inner Mangolia) या राज्याची होहोट ही राजधानी आहे. होहोट हे एक ऐतिहासिक शहर आहे. या शहरात अनेक प्रेक्षणीयस्थळे आहेत. त्यांतील काही स्थळांना भेट देण्याचा योग आला. लक्षात राहण्यासारखी भेट होती ती, पंचपगोड्याची. या भेटीचे धावते वर्णन देण्याचा या लेखात प्रयत्न केलेला आहे.



पंचपगोड्याचे प्रवेशद्वार


गौतम बुध्दाने बौद्ध धर्माची स्थापना केली. त्यांच्या शिष्यांनी या धर्माचा वेगवेगळ्या देशांत प्रसार केला. तिबेट हा भारताला लागून असलेला प्रदेश. या प्रदेशावर या धर्माचा प्रभाव, अर्थातच आधी पडला. त्यानंतर तिबेटमधल्या भिक्षुकांनी धर्मप्रसाराचे कार्य केले. त्यांचे कार्य दूरवर पसरले. मंगोलिया हा चीनपासून शेकडो किलोमीटर दूर असलेला प्रदेश. तिथपर्यंत तिबेटमधील प्रसारक पोहोचले.



पर्यटकांची गर्दी

होहोटमधील पगोड्यावर प्रामुख्याने तिबेटचा प्रभाव जाणवतो. ही इमारतच मुळी भारतीय बनावटीची आहे. या इमारतीच्या चोहोबाजूंनी धर्मातील महत्त्वाची तत्त्वे लिहिलेली आहेत. हे लेखन तीन भाषांत केलेले आहे. पहिली भाषा आहे संस्कृत, दुसरी भाषा आहे चीनी आणि तिसरी भाषा आहे मंगोलियन. इमारतीच्या भोवती फिरताना लक्षात येते ती ग्रहगोलांसंबंधीची माहिती. दगडांनी बनविलेल्या वर्तुळाकार चकतीवर अनेक खगोलीय भूचित्रे काढलेली आहेत. त्या काळात खगोलशास्त्रातील जी काही

माहिती उपलब्ध होती ती दाखविण्याचा तेथे प्रयत्न केलेला आहे.




तीन भाषांतील मजकूर

इमारतीच्या वर जाण्यासाठी एक वळणावळणाचा रस्ता आहे. हा रस्ता इतका अरूंद आहे की एका वेळेस फक्त एकच व्यक्ती जाऊ शकते. वर गेल्यावर पाच पगोडे स्पष्ट दिसतात. इमारतीच्या चार कोपऱ्यांत चार आणि मध्यभागी एक, असे पाच पगोडे तिथे आहेत. त्यांतील प्रत्येक पगोड्यावर अतिशयचांगली कलाकृती कोरलेली आहे.



पंचपगोड्याची देखणी इमारत

पगोड्याच्या पुढच्या भागात काही इमारती आहेत. त्यांतील एका इमारतीत प्रदर्शन भरविलेले आहे. बऱ्याच महत्वाच्या वस्तू तिथे ठेवलेल्या आहेत. त्याचबरोबर इतर इमारतींमध्ये वेगवेगळ्या मूर्ती ठेवलेल्या आहेत. पगोड्याची इमारत साधीच आहे. परंतु त्या परिसरात असलेल्या इतर इमारती चीनी संस्कृतीप्रमाणे खूप रंगीबेरंगी आहेत. या परिसरात फेरफटका मारल्यानंतर आपले मन आनंदित झाल्या शिवाय राहात नाही.



प्रदर्शनातील चित्र

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

•••

*वर्गणी पाठवण्याचा पत्ता*
डॉ. बेडेकर विद्यालय,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
०२२-२५४२६२७०

# संघर्ष हेच जीवन, आत्महत्या नव्हे!

*पालघरच्या दांडेकर महाविद्यालयाच्या कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष व आमचे मित्र प्रा. अशोक ठाकूर यांच्या सहकार्याने त्यांच्या महाविद्यालयीन वार्षिकातील हा लेख पुनर्मुद्रित करत आहोत. – संपादक*

उद्याचा भारत घडविणारी पिढी म्हणून सारा देश आजच्या पिढीकडे आशेने पाहत आहे. आधुनिक युग हे स्पर्धेचे युग आहे. चढाओढीला तोंड देताना युवक - युवती हैराण होतात. आज रूढींचे रूपांतर फॅशनमध्ये झाले, गुरुकुलांची जागा विद्यालये, विद्यापीठे यांनी घेतली आणि गुरुदक्षिणेऐवजी 'डोनेशन' घेतले जात आहे. खाणीतून सोने काढणे सोपे असते, परंतु सध्याच्या बिकट प्रसंगी चारित्र्यसंपन्न व सत्प्रवृत्त मानव निर्माण करणे कठीण आहे.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद हे वर्गात पहिले आले नव्हते. तरीही ते जीवनात यशस्वी ठरले. शिखरावर नेहमीच रिकामी जागा असते. आपले ध्येय निश्चित असेल तर शिखर सहज गाठता येते. मात्र आज मुले परीक्षेत अपयश आल्याने नाऊमेद होतात. त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. सुशीलकुमार शिंदे, आईनस्टाईन, इंदिरा गांधी, कुसुमाग्रज, यशवंतराव चव्हाण, ना.सी. फडके, आर.के. लक्ष्मण हे कधी ना कधी नापास झालेले असले तरी जीवनाच्या परीक्षेत मेरिटमध्ये आले.

जीवनात यश - अपयशाचा लपंडाव चालूच असतो. बुद्धीचे सात प्रकार मानले गेले आहेत ते पुढील प्रमाणे :- तार्किक, भावनिक, सांगीतिक, अवकाशी, शारिरिक, गतिवेधक, स्वसंवादी व परसंवादी. आपल्यात कोणत्या प्रकारची बुद्धिमता आहे हे ओळखून त्यानुसार आपण आपले ध्येय गाठू शकतो. प्रा. रमेश तेंडुलकर यांनी सचिनची शारिरिक गतिवेधक बुद्धिमता ओळखली व क्रिकेट खेळण्यासाठी त्याला वाव दिला. सचिनला रमाकांत आचरेकरांसारखे गुरु लाभल्यामुळे त्याच्या या बुद्धिमत्तेचा विकास झाला व तो क्रिकेटमध्ये मास्टर - ब्लास्टर ठरला.

बुद्ध्यंकाप्रमाणे भावनांकही महत्त्वाचा असतो. जीवनात, यशस्वी, समाधानी व आनंदी होण्यासाठी बुद्ध्यांकाचा वाटा २०% असतो. व भावनांकाचा वाटा ८०% असतो. बुद्ध्यांक उपजत असतो. तर भावनांक असणारी व्यक्ती दुसऱ्याच्या भावनांचा आदर करते. ती संयमी, मनमिळाऊ, आनंदी असते. जबाबदारीने वागते, इतरांवर टीका करीत नाही, संशय घेत नाही.

अपयश प्रत्येकाच्या वाट्याला येते, त्यामुळे खचून जाण्याची गरज नाही. वर्तमान पत्रात रोज येणाऱ्या बातम्या वाचून धक्का बसतो. ज्या वयात मनसोक्त हुंदडायचं, खोड्या करायच्या, अभ्यास करता करता निव्वळ आनंद मिळवण्यासाठी छंद जोपासायचे. . . त्या कोवळ्या वयातील मुले जगाकडे पाठ करून आत्महत्येच्या मार्गाकडे वळतात. उच्च शिक्षणासाठी महिनोन् महिने कुटुंबापासून दूर रहावे लागते. माया, प्रेम, एकमेकांना आनंद देण्यासाठी करावा लागणारा त्याग या साऱ्या नाजूक भावनांपेक्षा रुक्ष, कोरडा व्यवहार आणि तडजोड नकोच ही प्रवृत्ती याचे प्रमाणही आपल्याकडे दिवसेंदिवस वाढत आहे.

Education gives a perfect face to life.
Education gives a holy power to flight.
Education destroies darkness with the help of light.
Education gives a man broad sight.

तुमच्या मित्राच्या गुन्ह्यात तुमचा सहभाग असणे, म्हणजे तुम्हीच तो गुन्हा करण्यासारखे आहे. – लॅटिन म्हण

असं शिक्षणाचं वर्णन केले जाते. माणसाला जीवनाचं अधिष्ठान देणारं, सामर्थ्य देणारं, जीवनातील अंधकार दूर करणारं, मानवाला विशाल दृष्टिकोन देणारं असं शिक्षणाचं हे वर्णन आपणाला दिलासा देणार आहे. आज विज्ञानयुगात जगायचं असेल, नुसतं जगायचं नाही तर संकटांना सामोरे जाण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. त्या शिवाय तरणोपाय नाही, हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे.

जग ज्या वेगाने पुढे जात आहे याच वेगाने समजावून घेत, नवी पिढी त्याला कशी सामोरी जाईल याचाही विचार शिक्षक व पालक यांनी केला पाहिजे. शिक्षण व्यवस्थेनेही याकडे डोळसपणे पाहणे गरजचे आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढतच आहेत. शारदाश्रमाचा सुशांत पाटील आणि डी. वाय. पाटील कॉलेजची भजनप्रीत यांना प्रगती पुस्तकातील नापासाचा शेरा जीवावर बेतला. डोंबिवलीची नेहा सावंत पालकांच्या दबावाची बळी ठरली. संगमनेरच्या 'अमृतवाहिनी इंजिनीअरिंग' ची धनश्री पाटील हिने परीक्षेतील अपयशाने खचल्याने आयुष्य संपवले. तसेच काही विद्यार्थीनी लैंगिक अत्याचाराला बळी पडल्याने आत्महत्या हा मार्ग स्वीकारतात.

वाढते शहरीकरण प्रचंड स्पर्धा अभ्यासाचा वाढता बोजा आणि अभ्यासाबरोबरच इतर उपक्रमांमध्ये क्रमांक मिळवण्याचा अट्टाहास मुलाच्या जीवावर उठलाय पण, याला नक्की जबाबदार कोण?

### शिक्षणपद्धती की पालकांच्या अपेक्षा?

आपल्या पाल्याला ९०% मिळाले पाहिजेत - यामुळे पालक आपल्या पाल्याला अभ्यासाच्या दबावाला बळी पडतात. गेल्या चार-पाच वर्षात हे प्रमाण खूप वाढलेले दिसून येते. मात्र विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्येला नेमके कारण काय? यासाठी आवश्यक उपाय योजून वेळीच आळा घातला पाहिजे.

'अपयश स्वीकारा ते पचवा आणि पुढे जा' हा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या टाळण्याचा एकमेव मार्ग आहे ! मानसशास्त्रज्ञांच्या मते. 'पालकांचा दबाव' हे एकच कारण नाही. पालकांनी मुलांकडून अपेक्षा करताना मुलांच्या क्षमता जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्या मुलांची तुलना इतर मुलांशी करू नये त्यांच्या क्षमता त्यांचा कल पाहून त्यानुसारच ध्येय निश्चित करावे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे पालक आणि मुलं यांच्यातील 'कम्युनिकेशन गॅप' होय. आई-वडिल दोघेही दिवसभर कामात असल्यामुळे त्यांना मुलांकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. मुले जर टी.व्ही. पाहत असतील तर त्यांना न ओरडता चांगल्या व वाईट गोष्टीतील फरक सांगायला हवा. जडणघडणीच्या वयात मुलांवर भावनिक दबाव टाकू नये; तरच चांगल्या पिढीची अपेक्षा करता येईल.

कु. सविता रमेश घुगरे
पालघर

•••

## आवाहन

आपल्या संकुलातील अनेक विद्यार्थी चांगल लेखन करतात अशा विद्यार्थ्यांचे वैचारिक लेख (कविता नको) दिशासाठी पाठवाव्यात त्यांचा नक्की विचार केला जाईल.

तसेच आपल्या संस्थेचे वार्षिक पाठवल्यास त्यातूनही काही निवड करता येईल. वार्षिक दिशाच्या नावे मंडळाच्या कार्यालयातच पाठवावे

- संपादक

# स्वामी रामतीर्थ

(परिशिष्ट १)

*स्वामी रामतीर्थांवरील लेख मालेचे पहिले परिशिष्ट येथे देत आहेत दुसरे परिशिष्ट पुढील अंकात देण्यात येईल. त्याबरोबर ही मालिका पूर्ण होईल. - संपादक*

**प्रास्ताविक :**

स्वामी रामतीर्थ यांनी ठिकठिकाणी अनेक व्याख्याने दिली. त्यांच्या व्याख्यानांतील काही विचार या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आले आहेत. व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांनी खूप प्रवास केला. कॉलेजला सुटी असेल त्यावेळी वृंदावन, मथुरा, काशी, कुरुक्षेत्र, हृषिकेश अशा पवित्र ठिकाणी जात. तेथे विद्वत्ता प्रचुर व वेदान्त रसपूर्ण व्याख्याने देत. तसेच जपान व अमेरिकेत त्यांची व्याख्याने झाली. पॉलिन व्हिटमन ही लघुलिपीत व्याख्याने टिपून घेई, टंक लिखित करुन वृत्तपत्रात प्रसिद्ध करी. काही व्याख्याने लखनौ येथील 'रामतीर्थ पब्लिकेशन' यांनी आठ खंडांत प्रसिद्ध केली. 'In words of God Raligation' या नावाने जगाला त्याचे ज्ञान झाले.

त्यांच्या व्याख्यानांतील काही मौलिक विचार देण्यात येत आहेत.

**वेदान्ताचा प्रसार कसा करता येईल :**

प्रश्न - वेदांताचा फैलाव करण्यास, कोणता उपाय, कोणती पद्धत उत्तम?

उत्तर - वेदान्ताचा फैलाव करण्याचा उत्तम उपाय म्हणजे वेदान्त स्वत: आचरणात आणणे. त्या प्रमाणे आपण वागणे होय. याहून अन्य मार्ग नाही.

संपत्ती, बाह्य मदत, याचना, इत्यादी गोष्टींच्या साहायाने लोकांना सुधारण्याचे प्रयत्न शेवटी फिसकटणार हे ध्यानात ठेवा. अंतर्यामीच्या सत्य तत्वावरच अवलंबून रहा. बाह्य मदत आपणहून तुमच्याकडे येईल. मेहरबानी म्हणून त्याचा स्वीकार करा. बाह्य वस्तूवर तुम्ही आपली सारी भिस्त ठेवलीत, म्हणजे त्या वस्तू तुम्हांला सोडून जातात असा नियम आहे. या करता बाह्य मदतीचे स्तोम माजवू नका. आपल्या स्वत:वर विश्वास ठेवा. बाह्य आकार, मोठाल्या पदव्या, किताब यांच्यापासून कोणाचे काही भले झाले नाही. कोणाचे खरे हित झालेले नाही. त्याचे पर्यवसान दु:ख आणि त्रास यांत होते.

**तीन मुख्य विभाग :**

हिंदुस्थानात सर्व पंथांचे तसेच जगातील सर्व पंथ-देखील तीन मुख्य विभागाखाली आणता येतील या तीन विभागांना आम्ही गीर्वाण भाषेमध्ये - तस्यैवाऽहं तवैवाऽहम्, त्वमेवाऽहम् असे म्हणतो.

पहिल्याचा अर्थ मी त्याचा आहे. या पंथाचे पटल अतिशय घन असते. पंथाची दुसरी पायरी मी तुझा आहे. या दोहोंतील फरक लक्षात आला असेल. आध्यात्मिक मार्गाच्या पहिल्या पायरीवरील भक्त वा साधक ईश्वर कोठे तरी दूर अदृश्य आहे असे मानून तृतीय पुरुषामध्ये ईश्वरास संबोधतो आणि मी त्याचा आहे असे म्हणतो. धार्मिक वृत्तीचा हा आरंभ आहे. प्रत्येक आध्यात्मिक शिशुला हा मातेच्या दुधाप्रमाणे आहे. या दुधाचे प्राशन केल्यावाचून कोणाची ही धर्मामध्ये प्रगती व्हावयाची नाही. मी त्याचा आहे एवढेच पूर्णपणे वाणले तर पहाटे उठताच माझा स्वामी मला उठवतो असे वाटते, उद्योगधंदा करतानादेखील आपला प्रेमळ स्वामी हे आपणांस करावयास लावत आहे

---

नेहमीच्या गोष्टी वेगळ्या रीतीने केल्या, की जगाचे लक्ष तुमच्याकडे वेधले जाते. - जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर

अशी भावना होताच सर्व ईश्वराचे आहे असे गणले जाते. आपले घर, बंधुजन मित्र हे सर्व ईश्वराचे आहेत व सर्व ईश्वराने आपणांस दिले आहे असे मानले तर केवढी क्रांती होईल पहा. सर्व जग प्रत्यक्ष स्वर्गच नाही का बनणार?

अता दुसऱ्या आध्यात्मिक पायरीची बैठक - मी तुझा आहे पहिल्यापेक्षा ही मधुरता. जी अधिक प्रियकर व रमणीय. मी तुझा आहे या वाक्यात ईश्वर तृतीय पुरुषात संबोधला जात नाही. तो अधिकाधिक जवळ येतो व आपणांस त्याची ओळख होते. आध्यात्मिक मार्गाच्या पहिल्या स्थितीत खऱ्या श्रद्धेचा संयोग झाला असता नेत्रपटल काही वेळ तरी दूर होते. अंत:करणापासून शरीराच्या रोमरोमा मधून मी ईश्वराचा आहे. मी त्याचा आहे ही कल्पना बाणते. त्यामुळे निर्माण होणारे भाव, निष्ठा, उत्साह, जोम या योगे डोळ्यांसमोरील पडदा नाहीसा होतो आणि तो ईश्वरी स्वरूपात मग्न होतो.

तिसऱ्या पंथाचे नांव त्वमेवाऽहम् - मी तूच आहे. इथे ईश्वराच्या सन्निध येतो. पहिली स्थिती मी त्याचा, दुसऱ्या स्थितीत मी तुझा, अंतिम स्थितीत दोघे एकच होतात. भज्य आणि भक्त भक्तीत लीन होतात. या प्रमाणे वेदान्ताचा अनुभव येतो. ईश्वराचा खरा भक्त ईश्वरात मिळून जातो. मी तो आहे, तुझा आहे. मी ईश्वर आहे. त्याहून मात्र कमी नाही. आध्यात्मिक उन्नतीची ही शेवटची पायरी. हीच श्रेष्ठ भक्ती होय. यालाच वेदान्त म्हणतात. यालाच जीवन्मुक्त म्हणतात.

**त्याग म्हणजे काय? :**

त्याग म्हणजे तपश्चर्या करणे, दुसरी कडक व्रते करणे, नव्हे. प्रत्येक वस्तुसंबंध पवित्र करून टाकणे म्हणजेच खरा त्याग होय. मुलाचा त्याग करणे म्हणजे मुलाशी असलेला संबंध तोडून टाकणे नव्हे. त्या मुलाला ईश्वर मानणे हे होय. प्रत्येक व्यक्तीमधील ईश्वरी तत्त्वाची ओळख करून घेणे याचे नाव त्याग. नवराबायको शत्रूमित्र इतर संबंध याचा त्याग करा असे वेदान्त सांगतो त्याचा अर्थ त्या त्या व्यक्तीतील ईश्वरी तत्त्व जाणा.

**चार प्रकारची कर्तव्ये :**

कर्तव्य किंवा धर्म चार प्रकारचे आहेत. पहिले कर्म ईश्वरासंबंधी, तिसरे देशसेवेच व चवथे स्वत: विषयीचे. या चारही कर्तव्यांच्या शेवटी एका कर्तव्यात अंतर्भाव होतो. ते म्हणजे स्वत: विषयीचे होय. जे आपले स्वत:चे ऋण पूर्णपणे फेडतात त्यांची बाकीची तीन ऋणे आपोआप फिटतात.

कृपा तीन प्रकारची १) ईश्वरी कृपा २) गुरुकृपा ३) आत्मकृपा ज्याच्यावर गुरुकृपा होते त्याच्यावर ईश्वरी कृपा होते, गुरुकृपा होताच ईश्वर कृपा आपोआप होते.

**ओढा व ढकला :**

जीविताच्या सर्व दरवाजावर ओढा असे लिहिलेले असते. पण तुम्ही ते बरोबर न वाचता ढकलू लागला. मग दार कसे उघडेल?

ढकलणे म्हणजे बुद्धिवाद करणे, ओढणे म्हणजे प्रेमाने दुसऱ्याची अंत:करणे आपल्या स्वाधीन करून घेणे. स्फूर्तीच्या मंदिरात प्रवेश करण्यात अंत:करण (हृदय) हे एकच द्वार आहे. व डोके (बुद्धी) हे मंदिरातून बाहेर पडण्याचे दार आहे. प्रेम स्फूर्ती उत्पन्न करते व बुद्धी विवरण करते. ज्या प्रमाणे आधी देह नंतर वस्त्र प्रावरण त्याच प्रमाणे आधी मनोवृत्ती, मग विचार. कोणत्याही व्यक्तीच्या मनोवृत्ती बदला म्हणजे त्याच्या विचार पद्धतीत पूर्ण क्रांती होईल.

**चातुर्वर्ण्य :**

स्वदेशाच्या कल्याणाकरता कोणताही स्वार्थत्याग करणे हा अखिल विश्वाचे नियमन करणाऱ्या देवता प्रीत्यर्थ केलेला यज्ञ होय. खरा ब्राह्मण तोच की जो राष्ट्रोन्नतीचा

विचार करण्याकडेच आपल्या बुद्धिमत्तेचा सदुपयोग करतो. स्वदेशाकरता आत्मयज्ञ करण्यास प्रतिक्षणी सिद्ध असणे हीच खरी क्षात्रवृत्ती. जी संपत्ती देवदयेने आपणाला मिळाली आहे ती केवळ स्वत:च्या चैनीकरता मिळालेली नसून राष्ट्र कार्यार्थ खर्च करण्याकरता आपणा जवळ ठेवलेली ती राष्ट्राची ठेव आहे अशी अंत:करणात भावना असणे हीच खरी वैश्य वृत्ती. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या तीन्ही वृत्तींचे तेज आपल्या ठायी असायला हवे.

**लोकसंख्या – बालविवाह :**

हिंदुस्थाना इतका माणसांनी खेटलेला आणि अठरा विश्वे दारिद्र असलेला दुसरा देश साऱ्या दुनियेत तुम्हांला सापडणार नाही. लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न जोपर्यंत सोडवला जात नाही तो पर्यंत परस्पर प्रेम भावाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या गप्पा फोल आहेत. भोवताली भयंकर दैन्य पसरले असता प्रेम आणि सहकारिता यांची समाजात वाढ होण्याची आशा बाळगणे हे मृगजळाच्या पाठीस लागण्याप्रमाणे मूर्खपणाचे नाही काय?

आमच्या अवनतीबद्दल आम्ही कधी मुसलमान राज्यकर्त्यांला, कधी इंग्रज सरकारला दोष देतो. कधी धर्माच्या कपाळावर अवनतीचे खापर फोडतो. कधी शिक्षण पद्धतीच्या नावाने हाकारी करतो. या हाकारीत सत्याचा थोडा अंश असला तरी हिंदुस्थानच्या अवनतीचे मुख्य कारण आमची सांप्रतची लग्न पद्धती होय. मूळचा पवित्र विवाह संबंध दूषित करणाऱ्या नीतीच्या चुकीच्या कल्पनाच हिंदुस्थानच्या अधोगतीचे कारण आहेत. या पवित्रतम अशा विवाह संबंधाला अत्यंत निष्काळजीपणाने आणि धर्म शास्त्राच्या आज्ञानास न जुमानता बिन दिक्कत पायाखाली तुडवण्यात येते. अल्पवयी मुला मुलींची लग्ने लावून पशुनाही लाज आणणारा हा अमानुष प्रकार पाहून थरकाप होतो. निर्जीव निस्तेज नि:सत्व आणि देशाला भारभूत असे भिक्षेकरी उत्पन्न करता अशा विवाहाची परिणती होते – स्वामी रामतीर्थ

**दैवी सामर्थ्यांचा अपव्यय :**

विषयाचे मनन चिंतन व उपभोग यांच्याद्वारे जी मानवी शक्ती फुकट जात असते तिचा निग्रह करून स्तंभन केल्यास तिचे ओजात रुपांतर होऊ शकेल. व असे झाले म्हणजे आध्यात्मिक सामर्थ्याचे बारमाही झरे तुमच्या शरीरातून वाहू लागतील. परंतु विषय वासनांचा संयम करण्यास शिकले पाहिजे. ज्याला आपल्या काम वासना ताब्यात ठेवता येत नाहीत आणि जगातील अत्यंत गंभीर असा जो पतिपत्नी संबंध ह्या विषयीची जो मूर्ख थट्टा आरंभितो तो आपल्या जीवितावर आपण होऊन घाला घालीत असतो. तो आपले रक्त आपल्याच हाताने नाश करीत असतो. दैवी सामर्थ्यांचा, ओजोचा अनाठायी व्यय हेच सर्व पापाचे बीज आहे. उग्र जीवनसंग्राम माजविणाऱ्या विवेकशून्य प्रजोत्पादनामुळेच त्यांच्या आचरणाला कायमचा काळिमा आलेला आहे. पशूत नैसर्गिक प्रवृत्तीने त्यांचे विषयोपभोग होत असतात. उगाच लहर आली म्हणून चैनी खातर ते विषयोपभोगास केव्हाही प्रवृत्त होत नाहीत. मनुष्य केवळ चैनी खातर ताळतंत्र न ठेवता विषयोपभोगास प्रवृत्त होतो. व मुलांची बेसुमार वाढ करतो ही पशुपेक्षाही वाईट स्थिती नाही काय? – स्वामी रामतीर्थ

**शिक्षणाचा खरा हेतू :**

देशातील साधनसामग्रीचा योग्य उपयोग करून घेण्याचे सामर्थ्य अंगी बाणणे हाच शिक्षणाचा खरा हेतू आहे. ज्या ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारात आपणांस उपयोग करता येत नाही अशा प्रकारचे ज्ञान डोक्यात कोंबून ठेवणे हे एक प्रकारचे मानसिक अपचन आहे. ती एक प्रकारची आध्यात्मिक बद्धकोष्ठता आहे.

**आहार विचार :**

काय खावे आणि काय खाऊ नये या बाबतीत अनेक विधिनिषेध आहेत; परंतु खाण्यापिण्याच्या प्रश्नांचे इतके अवडंबर माजूनही काय खावे आणि कसे खावे या प्रश्नांचा शास्त्रीय दृष्ट्या विचार झालेला दिसत नाही. या बाबतीत आमच्या बौद्धिक सामर्थ्याचा निष्कारण दुरुपयोग होत आहे. आपल्या जेवणाखाण्यात नवीन शास्त्रीय ज्ञानाप्रमाणेच योग्य ते फेरफार करा.

**भारताचे भवितव्य :**



स्वामी रामतीर्थ

हा हिंदुस्थान देश एके काळी विद्येच्या व ऐश्वर्याच्या शिखरावर चढला होता. भारतवर्षाच्या उत्कर्षाचा तो मध्यान्ह काळ होता. हा भाग्य सूर्य आपली पृथ्वी प्रदक्षिणापूर्ण करून द्विगुणित तेजाने हिंदुस्थानवर पुन: प्रकाशू लागेल. हिंदुस्थानच्या अधोगतीचे एकलकोंडेपण हेच मुख्य प्रबळ कारण आहे. असे आपणांस आढळून येईल. कूप मंडुक वृत्तीनेच कोणत्याही राष्ट्राचा ऱ्हास होत असतो. आपल्या प्रकाशाचा इतरांना फायदा मिळू नये या स्वार्थबुद्धीने आम्ही आपण होऊन दारे खिडक्या बंद केल्या. परमेश्वर हा व्यक्तीचा अभिमानी नाही तसेच ऐश्वर्यही एखाद्या विशिष्ट भूप्रदेशाला चिकटून राहात नाही. सर्वात्म भावाचा लोप झाल्यामुळे भेदभाव वाढत जाऊन आम्ही दीन आणि दुबळे झालो. स्वार्थत्यागयुक्त कर्तव्य यावर अधिक जोर न देता स्वार्थसाधक हक्कावर अधिक जोर देण्यात येऊ लागला. हीच पुढाऱ्यांची मोठी चूक झाली. ही चूक सुधारल्याशिवाय आता गत्यंतर नाही.

**मनोवृत्तीत बदल :**

आनुवंशिकता व संयोजन या दोन तत्वांनुसार जीवांची उत्क्रान्ती होत असते. शिक्षणाने स्वत:ची उन्नती करून घेणे, परिस्थितीप्रमाणे स्वत: बदलणे ही जी संयोजन शक्ती ती वनस्पती व पशु यांच्या ठिकाणी दिसून येत नाही. हाच मनुष्य व इतर जीव कोटीतील महत्त्वाचा फरक आहे. प्रिय बांधव हो, प्राचीन चालीरीतीला चिकटून बसून त्यात परिस्थिती प्रमाणे योग्य फेरफार करण्याचा कंटाळा करून स्वत:ला मनुष्याहून खालच्या कोटीत ढकलू नका. आनुवंशिकतेलाच चिकटून चालणार नाही हे लक्षात ठेवून संयोजन शक्तीचा योग्य उपयोग करण्यास शिका.

**प्रवृत्तिपर वेदान्त :**

प्रवृत्तिपर वेदान्ताप्रमाणे मनुष्याची प्रत्येक क्रिया प्रत्येक विचार हा देवता प्रीत्यर्थ केलेला यज्ञ होय. वेदान्तात देव याचा अर्थ निरनिराळ्या इंद्रियांना चेतना आणि प्रकाश देणारी शक्ती असा आहे.

अहं भावाला सुळावर चढवून सर्वात्म भावाच्या रुपाने त्याचे पुनरुज्जीवन होणे यालाच प्रवृत्तिपर वेदान्त असे म्हणतात. याचीच भक्ती आणि ज्ञान अशी दोन निरनिराळी स्वरुपे आहेत. प्रत्येक मनुष्याने प्रार्थना करण्यास शिकले पाहिजे. हे परमेश्वरा माझ्या हाताचे सारे सामर्थ्य तुझी प्रीती संपादन करण्यासाठी सदोदित काम करत राहू दे. हे प्रेममया माझे अंत:करण काढून घे आणि ते सर्वात्म भावाच्या

प्रेमामृतात बुडून जाऊ दे. हे करुणाघना माझे मन घेऊन जा, आणि आपल्या हृदय पिंजऱ्यात ते बंद करून ठेव अशी रीतीने देवाला सर्वस्व वाहून टाकल्यावर तत्त्वमसि या परमात्म भावाच्या निरतिशय आनंदाच्या स्थिती प्रत तुम्ही जाऊन पोहोचाल.

**समाज तरेल तरच तुम्ही तराल :**

काबाड कष्ट करण्याविषयी तिरस्कार, जाति आणि पंथ यांच्या नावाखाली झालेले अनेक अस्वाभाविक भेद आणि पोटभेद, परदेश गमनाविषयी द्वेष बुद्धी, बाल विवाह आणि एकंदर स्त्री समाजाची शारीरिक व बौद्धिक अवनति इत्यादी सर्व सामाजिक दोषांचा, व व्यावहारिक ज्ञानाचा अभाव अवनतीचे खरे कारण आहे. आपले काम बरे आपण बरे आहे ती स्थिती कायम राहू देऊन स्वत:ची उन्नती करून घेतली म्हणजे झाले. परंतु ही गोष्ट शक्य आहे काय? समाज तरेल तरच तुम्हीच तराल – स्वामी रामतीर्थ

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

•••

**मानवी जीवनातील फोलपणाचा प्रत्यय आला आणि सिद्धार्थ बुद्ध झाला. सर्व मोठ्या विचारवंताचे हे वैशिष्ट्य आहे की त्यांच्या आयुष्यात कधीना कधी दु:खाचे जवळून दर्शन घडते.**

**– दैनंदिनीतून**

## आंतराष्ट्रीय गणित वर्ष

संस्कृत ही इंडोयुरोपियन कुटुंबातील एक प्राचीन भाषा आहे. या भाषेत भारतीय भाषांचे उगमस्थान असून भारतीय भाषांच्या मुकुटातील एक शिरपेच मानले जाते. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद या संस्कृत भाषेतील प्रारंभीच्या साहित्यकृती होत. संस्कृत साहित्यात वेद संहिता, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे असे चार प्रकारचे साहित्य आहे. वेदानंतर रामायण व महाभारत या महाकाव्यांची निर्मिती संस्कृतची देणगी आहे. पाणिनीने २६०० वर्षांपूर्वी संस्कृतच्या व्याकरणशास्त्राची पुनर्रचना करून 'अष्टाध्यायी' ग्रंथ लिहिला. तो आजही आधारभूत व प्रमाणभूत मानला जातो. संस्कृत साहित्यात महाकाव्य, लघुकाव्य, संगीतशास्त्र, वैद्यकशास्त्र, कोशवाङ्मय, धर्मशास्त्र यांविषयी विपुल लेखन झाले आहे. गणित विषयाचा विचारकरता गणिताचा व संस्कृतचा जवळचा संबंध असून संस्कृत साहित्याचे गणिताच्या विकासातही मोलाचे योगदान आहे. हे सूचित करणारा आहे.

– संदर्भ
प्राचीन काळचे गणित
आगाशे कुलकर्णी, पूर्वा प्रकाशन,
हिंगोली पृ. ७ – प्रस्तावना

# नवीन मराठी सायबर म्हणी

*आजच्या सायबर युगातला माणूस बोलताना नवीन म्हणी वापरत बोलला तर नवल वाटायला नको* - **संपादक**

- ★ *रिकाम्या मॉनिटरला स्क्रिन सेव्हर्स फार!*
- ★ *आपलाच कीबोर्ड नि आपलाच माऊस!*
- ★ *सेलेरॉन गेले पेंटीयम आले!*
- ★ *विंडोज दाखव नाहीतर इंस्टॉलेशन कर!*
- ★ *उचलला पॉईंटर अन् लावला आयकॉनाला!*
- ★ *मॉनिटर आणि सी. पी. यू. यांच्यात चार बोटांचे अंतर असते!*
- ★ *माऊसला मॉनिटर साक्ष!*
- ★ *फोर एट सिक्सच्या कळपात सेलेरॉन शहाणा!*
- ★ *लॅपटॉपचे बिऱ्हाड पाठीवर!*
- ★ *घरोघरी पेंटीयमचेच पीसी!*
- ★ *आपला तो पीसी दुसऱ्याचं ते मशीन!*
- ★ *व्हायरसच्या मनात ॲन्टीव्हायरस!*
- ★ *स्त्रीचं वय, पुरुषाचा पगार, कॉम्प्युटरचा स्पीड विचारू नये!*
- ★ *बडा सी. पी. यू पोकळ डेटा!*
- ★ *अडला कॉम्प्युटर यू. पी. एस् चे पाय धरी!*
- ★ *मनी वसे ते मॉनिटरवर दिसे!*
- ★ *नावडतीचा पीसी स्लो!*
- ★ *हार्डडिस्क सलामत तो सॉफ्टवेअर पचास!*
- ★ *चार दिवस हार्डडिस्कचे चार दिवस सीडीचे!*
- ★ *सीडींचा बाजार व्हायरसांचा सुकाळ!*
- ★ *वरून पेंटीयम आतून फोर एट सिक्स!*
- ★ *हार्डडिस्कमध्ये नाही ते फ्लॉपीत कोठून येणार!*
- ★ *घरोघरी मायक्रोसॉफ्टच्याच विंडो!*
- ★ *सॉफ्टवेअर नको पण व्हायरस आवर!*
- ★ *हा मदरबोर्ड नि हा प्रोसेसर!*
- ★ *यथा ऑपरेटर तथा कॉम्प्युटर!*

- संकलन
श्री. चंद्रकांत शिंगाडे, ग्रंथालय विभाग,
वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर

भारतीय साहित्यातील गीतांजलीचे महत्व स्वयंसिद्ध आहे. अनुवादाच्या सूक्ष जाणिवेतून केलेले विचार व्यक्त करणाऱ्या दोन प्रार्थना या अंकात देत आहोत. अनुवाद पुष्कळ झालेले असले तरी त्याचा त्याचा 'नजरीया' वेगळा असतो. - संपादक

**प्रार्थना ३२**

*By all means they try to*
*hold me secure who love me in*
*this world. But it is otherwise with*
*thy love which is greater than theirs,*
*and thou keepest me free.*
*Lest I forget them they never venture to*
*leave me alone. But day passes by after*
*day and thou art not seen.*
*If I call not thee in my prayers,*
*if I keep not thee in my heart,*
*thy love for me still waits*
*for my love.*

**प्रार्थना ३३**

*When it was day*
*theycame into my house and said, "*
*"We shall only take the smallest*
*room here." They said, "We shall*
*help you in thr worship of your God and*
*humbly accept only our own share of*
*his grace;" and then they took their*
*seat in a corner and they sat quiet*
*and meek. But in the darkness of night*
*I find they break into my sacred shrine,*
*strong and turbulent, and snatch*
*with unholy greed the offerings*
*from God's altar.*

**प्रार्थना ३२**

मिळतील तेवढे आवळूनीया
पाश जखडती मला, बांधुनी ठेवती मला
सुरक्षा कक्षात करीतात प्रीत जे मजवरी.
परी न्यारीच आहे रीत तंव प्रीतीची त्या सान्यांहूनी,
जी आहेच सर्व श्रेष्ठ तंव प्रीती, ठेवते जी मला
सतत (मुक्त) जावू दे मी विसरतो तयांना पुरतेपणी,
जे कधीही ना तयार, सोडावया मज एकलेपणी.
पण दिसामागूनी जाती दिवस,
तरी गवसतच नाहीस तू मला कधीही.
जरी मी ना कधीही बोलविले प्रार्थुनिया तुला,
ठेविले नाहीच कधीही हृदयांतरी माझ्या तुला,
तवप्रीत मजवरील, मात्र तिष्ठले,
पाहत वाट्जी माझ्या
प्रीतीची.

**प्रार्थना ३३**

जेव्हा ते आले माझिया घरीं
तेव्हा भर दिवस होता मजसी वदले '
'आम्ही बसू तेथे थोडक्या जागेवर दाटीवाटीने''
पुढे ते बोलले ''आम्ही करां सहाय्य तुझे
पूजेस्तव तव देवाच्या आणि मानु धन्यता त्या
देवाच्या कृपा प्रसादात्ता असेना कांकणभरी''
स्थिरावले ते तिथे मग कोपऱ्यात बसत शांततेने
मौन धरूनी. जाहली मग मध्यरात्र,
दिवस जाता संपुनि, काळ्या मिट्ट काळोखी मी त्यांना
पाहिले फोडताना मम पावन मंदिर एकवटूनी बल,
क्षोपसफल, आणि पळवताना, पापी धरूनी हाव,
दान प्रदाने लगबगीने, दान पेटीतून
आंतल्या गाभाऱ्यातूनी माझ्या
देवतेच्या.

- असीम

प्रेम, आपुलकी, दयाळुपणा आणि समंजसपणाची संपत्ती कमवा; पैसा मागोमाग येईलच. - मदर तेरेसा

# माहितीचा अधिकार

> पालघरच्या दांडेकर महाविद्यालयाच्या कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष व आमचे मित्र प्रा. अशोक ठाकूर यांच्या सहकार्याने त्यांच्या महाविद्यालयीन वार्षिकातील हा लेख पुनर्मुद्रित करत आहोत. - संपादक

## १) माहितीचा अधिकार म्हणजे काय?

माहितीचा अधिकार स्वातंत्र्यानंतर प्रथमच १२ ऑक्टोबर, २००५ पासून संपूर्ण देशातील नागरिकांना (जम्मू-काश्मीर सोडून) प्रदान करण्यात आला आहे. या कायद्यामुळे कोणत्याही सरकारी कार्यालयातील सार्वजनिक प्रधिकरण असलेल्या संस्थेतील माहिती नागरिकांना प्राप्त करता येते. याद्वारे महाराष्ट्र माहितीचा अधिनियम २००२ बनवण्यात आला आहे व संपूर्ण देशासाठी एकच कायदा २००५ पासून अमलात आला आहे.

कोणत्याही सरकारी प्रधिकरण वा त्यांच्या नियंत्रणाखाली कार्यालयातील कामाचे, दस्तऐवजाचे, अभिलेखाचे निरिक्षण करता येते.

दस्तऐवजाच्या, अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेता येतात.

फ्लॉपी, सी. डी., टेप्स, व्हीडीओ, कॅसेटच्या स्वरुपात वा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक प्रकारात वा प्रिंटआऊटच्या मार्फत माहिती घेण्याचा अधिकार नागरिकास असेल.

## २) माहितीचा अधिकार देण्यामागील उद्देश.

प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी वृद्धिंगत करण्यासाठी.

लोकशाही गणराज्यात माहितगार नागरिकांमार्फत भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी.

शासनयंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी.

शासनयंत्रणेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी.

नागरिकांना शासन कारभाराची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी.

## ३) माहिती कोणास व कोठे मिळू शकते?

प्रत्येक भारतीय नागरिकास माहितीचा अधिकार कायद्याखाली माहिती मिळविण्याचा अधिकार आहे.

न्यायालयात १८ वर्षावरील भारतीय नागरिकास अर्ज दाखल करता येतो; परंतु माहितीचा अधिकार कायद्याखाली भारतात जन्मलेली. भारताचा नागरिक असलेली कोणतीही १८ वर्षावरील तसेच वर्षाखालील व्यक्ती अर्ज करू शकते.

संस्था व ट्रस्ट अर्ज करू शकत नाही.

या अधिनियमाद्वारे प्रत्येक शासकीय प्रधिकरण, सहायक शासकीय माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व अपील अधिकारी यांची नावे, पदनामे घोषित करतील. अर्जदारास आवश्यक असलेली माहिती संबंधित कार्यालयात शासकीय माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून मिळवता येते.

## ४) माहिती कशी मिळेल?

माहिती मिळविण्यासाठी भारतीय नागरिकाने संबंधित कार्यालयात शासकीय माहिती अधिकारी यांच्या नावाने अर्ज करावा.

अर्ज साध्या कागदावर केला तरी चालेल. त्यात अर्जदाराचे नाव, पत्ता, माहितीचे वर्णन, कोणाकडे अर्ज करावयाचा आहे इत्यादी तपशिलाचा अर्ज स्वत:च्या स्वाक्षरीनिशी करावा.

अर्जास १० रु. कोर्ट फी स्टॅम्प लावावा. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र वा पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकेची प्रत इ. पुरावे सादर केल्यास १० रू. फी माफ आहे.

अर्जदार स्वत: पोस्टाद्वारे प्रतिनिधी मार्फत अर्ज सादर करू शकतो. जर अर्जदार निरक्षर, अपंगत्वामुळे लिहू शकत नसेल, तर माहिती अधिकारी त्यास अर्ज लिहिण्याबाबत विनामूल्य मदत वा व्यवस्था करेल.

शासकीय माहिती अधिकारी सदर अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत अर्जदाराने विहित फी भरल्यावर माहिती उपलब्ध करून देईल, अन्यथा अर्जदारास माहिती न मिळाल्यास माहिती नाकारल्याचे समजून अर्जदार अपील करु शकतो.

अर्जातील माहिती वेगवेगळ्या शाखेशी संबंधित असल्यास माहिती अधिकारी अर्ज मिळाल्यापासून पाच दिवसांच्या आत दुसऱ्या माहिती अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करून अर्जदारास लेखी कळवील.

अर्जदारास माहिती मागण्याचे कारण विचारता येणार नाही.

**५) कोणत्या प्रकारची माहिती देता येणार नाही.**

जी माहिती उघड केल्याने भारताचे सार्वभौमत्व व एकात्मतेवर विपरित परिणाम होईल.

जी माहिती कुठल्याही न्यायालयाने थेट प्रसिद्ध करण्यास बंदी घातली.

ज्यामुळे लोकसभा / राज्यविधिमंडळाचा / सदस्यांचा हक्कभंग होईल.

ज्यामुळे व्यावसायिक गुपिते / बौद्धिक संपदा हक यांचा हक्कभंग होईल.

विदेशी सरकारकडून गुप्तपणे प्राप्त झालेली माहिती.

**६) कोणत्या संघटना ज्यांना हा अधिनियम लागू नाही?**

खालील संस्थांना या अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्यात आले आहे.

इंटेलिजन्स ब्युरो, डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू, इंटेलिजन्स अंमलबजावणी संचालनालय, अमली औषदी द्रव्य नियंत्रण विभाग, विमानचालक संशोधन केंद्र, विशेष सरहद बल सीमा सुरक्षा बल विशेष सेवा विभाग, आसाम रायफल.

**७) विहीत कालावधी काय आहे?**

माहिती अधिकारी अर्ज मिळाल्यावर किती दिवसांत अतिरिक्त फी भरल्यानंतर माहिती पुरवील/ अर्ज फेटाळील – ३० दिवसात

एखादी माहिती तिसऱ्या पक्षाशी संबंधित असेल तर माहिती पुरविण्याचा कालावधी – ४० दिवसात

ऑक्टोबर २००५ पासून संपूर्ण देशात लागू झालेल्या माहितीचा अधिकार हा सरकारला लोकांच्या प्रती जबाबदार बनण्याच्या संघर्षपूर्ण लढ्याचा विजय आहे. यामुळे जनतेला विधानसभा सदस्य व संसद सदस्यांना जी माहिती प्राप्त होऊ शकते ती सर्व माहिती मिळविण्याचा अधिकार मिळाला आहे.

**– प्राजक्ता दिलीप राणे**

पालघर

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

(पूर्वार्ध)


*बीज, मॉडेल व साधना या लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रास्ताविक :


माझे परम मित्र श्री. नाना लेले यांनी ''मुळाक्षरे देवत्वाची'' हे प्रा. उत्तरा हुद्दार यांचे पुस्तक दिले व त्यावर अभिप्राय, भाष्य, परीक्षण लिहिण्याचा आग्रह केला. **मुळाक्षरे देवत्वाची**, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जून २०१०. 'दिशाच्या आपल्या मूळशीर्षकाला सुसंगत असा हा विषय, पुस्तक व परीक्षण असल्याने ते ह्या अंकात छापणे प्रस्तुत वाटले.

## पुस्तकाची तोंड ओळख :

ह्या पुस्तकाला मनोहर य. बापूसाहेब जोशी, संपादक, प्रसाद प्रकाशन यांचे 'मनोगत' हे लिखीत स्वरूपांत लाभले आहे. हे पुस्तक लिहिण्यास त्यांना श्री. राम शेवाळकर यांनी शिफारस केली होती.



''मूळात देव म्हणजे कोण? त्यांनाच देवत्व का द्यावे? आणि देवत्व म्हणजे तरी नेमके काय?'' असे प्रश्नांची उत्तरे शास्त्रीय दृष्टिकोन ठेवूनही, उत्तरा हुद्दार यांनी ''अतिशय मूलभूत असा अध्यात्मिक'' विचार मांडला आहे. असे श्री. जोशी यांना वाटले. पुढे ते म्हणतात, ह्या चिंतनाची सुरुवात उत्तराताईंनी 'देहापासून' केली आहे. देहापासून सुरुवात करून शाश्वत अशा ईश्वरी तत्वाकडे त्या वळल्या आहेत. परमेश्वर चिंतनाचा श्रीगणेशा करून त्यांनी सूर्य, विष्णू, राधा, दत्त, देवी शिव अशा दैवतांचा विचार करून ते मनन, चिंतन आपल्यापुढे मांडले आहेत.''



प्रा. उत्तरा हुद्दार आपल्या 'उमज प्रक्रिये'ची माहिती स्वत:च देतात. त्यांना २४ व्या वर्षापासून डोक्यात (कपाळात नव्हे) अशा वेदना होत व कांही 'स्वप्नसंकेत' होत. ह्याची पाश्चात्य 'ज्ञान पद्धतीने तपासणी घेतली गेली व्हर्जिनिया युनिव्हर्सिटी येथील डॉ इआन स्टीव्हनसन एम. डी. सायकीॲट्रीस्ट व पॅरासायकॉलॉजिस्ट यांनी या 'शारदा

केरला', **"xenoglossy an uncleaned language"** असे शीर्षक दिले म्हणजेच **"न शिकलेल्या भाषेचे ज्ञान -पुनर्जन्मसूचक"** असे ते विश्लेषण आहे, असे उत्तराताई सांगतात. पण, पुढे गणपती अथर्वशीर्ष व दुर्गा साधना ह्याचे स्पर्श झाल्यावर त्यांना **'देवतांचे अस्तित्व - नाकारणे योग्य नाही असे पटले!!**

पुढे त्या म्हणतात, 'तरुण वयात ज्याच्यावर प्रेम केले त्याला आणि पूर्वजन्मीच्या नवऱ्याला जाणले होते, त्यालाही दूर सारून मनाचा पट अधोमार्गी विषय वासनातून सोडवून घेताना झालेल्या वेदना मागे टाकल्या, तेव्हा "मीच माझी स्त्री, मीच माझा पुरुष" हा **"ज्ञानभाव" 'मनोगत व शरीरगत' होत गेला.** यापूर्वी **'प्रकृते: स्वत:तील पुरुषात् परम'** म्हणजे काय, ही जिज्ञासा होती ती शमली - स्वत:चे संपूर्णत्व (प्रकृती पुरुषमय) गवसू पहाते आहे ही जाण आली.

**त्यांची पुस्तक लिहिण्याची मूळ प्रेरणा व उद्देश कोणता?** त्यांच्या अनेक अनुभूती व मंत्रशास्त्राच्या आगम प्रवाहातून त्यांना 'देवतांबाबतचे' जे ज्ञान झाले ते प्रथम 'तरुण भारत' मधील लेखात वेळोवेळी मांडले गेले. या पुस्तकात ते एकत्रितपणे मांडले गेले आहेत. हे सर्व विस्ताराने उद्धृत करण्याचे प्रयोजन एवढ्यासाठीच की उत्तराताईंची मूळ प्रेरणा लक्षात घेऊन त्यांच्या सगळ्या लेखांची 'तपासणी' करणे हे जास्त योग्य वाटले.

त्यांच्या पुस्तकाच्या अनुक्रमाणिकेवरून एक अर्थ प्राप्त होतो. पंचायतन पूजा, मानवी शरीर, शक्ती, गणेश देवता, सूर्यदेवता, विष्णुदेवता, राधाकृष्ण, गुरुतत्व, जगदंबा, यंत्राची मातृकाशक्ती श्रीविद्या, लक्ष्मीपूजा, शिववासना, यज्ञरूप शिवपिंडी वगैरे विषयांतून त्यांनी 'देवता' शक्तींचा शोध घेतला , किंवा आपल्याला देऊ केला.


पण, ही शोध पद्धती कोणती? उत्तराताई या देवतांच्या अभ्यासात पुष्कळ अंशानी 'सामाजिक सर्वसामान्यांच्या ज्ञानाच्या किंवा तुटक अनुभवांच्या व कर्मकांडांच्या बहीर्गत जाळ्यातून कधी परंपरा कधी पुराणे, रूढी ह्या गुंतगुंतीतून प्रवास करतात. आपल्या साहित्यिक शैलीतून शब्दांकित गौरव स्थान सुद्धा प्रदान करतात.

त्या उलट, कांही विषयांच्या संदर्भात, मंत्रशास्त्र, कुंडलिनी, अध्यात्म, यज्ञ, बिंदू, निरंजन तत्व या तत्वसंकल्पनांच्याही जवळ येतात. पण, ते भाग वर्णनात्मकच राहून 'अनुभूती शास्त्र' व 'आध्यात्मिक आत्मद्धोराच्या उद्देशाकडे प्रवास करत नाहीत.


**असे कां होते?**

**अध्यात्मशास्त्र दोन प्रवाह :**

शंकराचार्य ते योगी अरविंद यांच्या संदर्भाचे उल्लेख वारंवार करताना त्यांना त्याच्या वेगळ्या तत्वज्ञानातील किंवा 'स्पिरीच्यूअल शास्त्रातील' गंभीर तफावतीचे 'ज्ञान या जाणीव' झाली असेल, असे जाणवत नाही.



हा मुद्दा महत्त्वाचा अशासाठी आहे की मानवाच्या विश्वाच्या व स्वत:च्या अस्तित्वाच्या व स्वत:च्या उन्नतीक्रियेच्या प्राप्तीसाठी ज्या मार्गांचा व साधनांचा, तत्त्वज्ञानांचा, अनुभूतिशास्त्रांचा पाठपुरावा मानवी समाजाने गेल्या अनेक युगायुगातून केला त्यांतील ६ दर्शने, उपनिषदे, चार वेद, अरण्यके, पुराणे व तंत्र साधने यांच्या पसाऱ्यातून दोन मार्ग प्रकर्षाने आज अग्रणी मानले जातात. ते म्हणजे निवृत्तिवादी, पारमार्थिक, **आदर्शवादी व मायावादी अव्दैत** तत्त्वज्ञान त्याचे प्रणेते आद्य शंकराचार्य व दुसऱ्या बाजूला ज्याला **"Integral spiritual science and yoga"** असे अरविंद म्हणतात. ह्यांतील मूलगामी फरक स्पष्टपणे जाणला नाही असे वाटते.




ह्या दोन थोर पुरुषांच्या विश्वरचनेतील रचना, साध्य, मानवी व चैतन्याचीच मौलिक, आध्यात्मिक प्रगतीचा वैश्विक रोड मॅप त्या संकल्पनेत गंभीर फरक आहेत.


**एकला ज्ञानमार्ग :**

शंकराचार्य हे, 'ज्ञानमार्गी' आहेत व त्यामुळे त्यांना मानवी शरीरमाध्यमाच्या सद्यस्थितीत केवळ वैचारिक, बुद्धी सामर्थ्यावर आत्म्याची उन्नती व मुक्ती होऊ शकेल असा विश्वास होता. ह्या मानवी जाणिवेची सुरुवात **'अथा तो ब्रम्हजिज्ञासा'** ह्या क्रियेने होते व त्यावर त्यांनी शंकरभाष्याची रचना केली. उत्तराताई पान १८१ वर म्हणतात तशी वेदांची सुरुवात 'अथा ते ब्रह्मजिज्ञासा' अशी होते, हे वाक्य तितकेसे बरोबर नाही. कारण ब्रह्म सत्यम जगतमिथ्य हे त्याचे प्रधान वाक्य, ह्या पृथ्वीवरील जीवनाचा 'माया' म्हणून अधिक्षेप करतात. उत्तराताईच लिहीतात, 'खरे तर ''ब्रह्म सत्यम् जगत दिव्याचा उत्तरार्ध, 'जिवो ब्रह्मैव ना परा' हा सामान्य जनांना पढविलाच नाही.

उलट, खुद्द शंकराचार्यांच्या अग्रणी शिष्यांच्या मते म्हणजे **माधवाचार्य, वल्लभाचार्य** वगैरेंनी, द्वैतवाद, विशिष्ट द्वैतवाद असे वेगळे विचार प्रसृत केले. एव्हढेच नव्हे तर **स्वामी दयानंद (आर्यसमाज)** ह्यांनी **त्रैतवादाचा विचार मांडला.** जीवात्मा, परमात्मा व प्रकृति अशी तीन चिरंतन तत्वे, प्रथम निर्माण झाली व त्यामधून परस्पर क्रियांनी चैतन्याची, जीवात्म्याची उन्नति, ह्या जड पृथ्वीवर होते आहे, असे सिद्धान्त मांडले त्यामुळे मानवी शरीर व त्या 'शरीर फॉर्ममधील' जन्मजात 'दैवी शक्ती' जागृत व आवाहन करून, त्या शक्तीमार्फत तसेच प्रकृतीतील व समष्टितील चैतनाशक्तीच्या सहकार्याने हा आत्मिक उद्धार व 'ब्रह्मज्ञान' प्राप्त होईल असा विश्वास व विचार प्रसृत केला. वैयक्तिक, एकांगी ज्ञानमार्ग हा शंकराचार्यांचा होय व वैयक्तिक मोक्ष हे उद्देश.

**Integral yoga marg :**

उत्तराताईंनी श्री अरविंद यांच्या 'Integral yoga' म्हणजे 'पूर्ण योगाची' दखल जरूर घेतली आहे. पण, त्यामध्ये पृष्ठ क्र. २०९ वर असा उल्लेख आहे कीं -




"Evolution उत्क्रांतिवाद व पुनर्जन्म या दोन प्रक्रिया मधून हीच गोष्ट घडत आली आहे, त्यामुळेच मत्स्य-कासव-वराह-नरसिंह-वामन-परशुराम-राम-कृष्ण -बुद्ध अशा उन्नत शरीर व उन्नत मानसतत्वांचे अवरोहण घडत आले आहे. असा त्यांचा सिद्धांत आहे" हे पूर्णात्वाने बरोबर नाही. "Form of Life will be commensurate with the level of consciousness" हे फक्त माझ्या शब्दांकनात व्यक्त केलेला विचार हा महायोगी अरविंदांचाच आहे. पण, जर पुराणांतील अवतारांच्या स्वरूपातील बदल seqnential rise in levels असा धरला व असा जरू उत्तराताईचा विचार असेल तर कृष्ण अवतारानंतर बुद्धाचा काळ म्हणजे बुद्ध हे कृष्णाच्या पूर्णावतारापेक्षा जास्त उन्नत व श्रेष्ठ अवतार होते असा होईल. हे अजिबात मान्य होण्यासारखे नाही. बुद्धाच्या विचारांचा व संप्रदायाचा जो पराभव व अध:पात भारतात झाला ती (भारततली) सर्वमान्य आहे. जग हे दु:खमय आहे. संन्यास हा समष्टिचा जीवनधर्म आहे व याचा पुढे, बुद्ध बिहार यांतील नैतिक अध:पात, हे प्रकार भारताने ओरिसा, बिहार वगैरे बुद्ध विहारामधून पाहिजे आहेत. तसेच शंकराचार्यांचा वाद मंडनमिश्राविरुद्ध झाला व बुद्धाचा तत्वज्ञानाची भारतात पिछेहार झाली, हा इतिहास आहे.

एव्हढे मात्र खरे की मूळ यज्ञ संकल्पनेत विकृती येऊन पशू हिंसा येऊन व वेदाच्या बहिर्गत कर्मकांडाची आध्यात्मिकक्षमता नाहीशी होऊन, गौतम बुद्धांचा निरस झाला व तो यज्ञसंस्थेच्या विरुद्ध उभा ठाकला व 'ईश्वर' कल्पनाही अमान्य करता झाला. त्याने मग शून्यवाद मांडला, हे त्याच्या तत्वज्ञानातले ठळक दोष भारताने पाहिले.

'यज्ञसंस्थेवर' पुढे स्पष्टीकरणात्मक भाष्य मी करतोच, पण प्रा. उत्तराताईंचे, हे वाक्य अनवधानाने किंवा वैयक्तिक स्वतंत्र विचारधारेत आले असेल असे मानल्यास सुद्धा चुकीचेच म्हणावे लागेल.

**पुस्तक लेखिकेची धारणा :**

आपण पुन्हा प्रा. उत्तराताई हुद्दार यांच्या 'मनोगताकडे' आऊ या 'प्रसाद' चे संपादक म्हणतात "देह हा नश्वर आहे हे जरी सत्य असले तरी परमेश्वराकडे जाण्याचा रस्ता हा त्या नश्वर देहात राहूनच शोधावा लागतो हे सत्यज्ञान त्यांना (उत्तराताईना) उमगले हे खरे कौतुक"

उत्तराताईच्या 'शारदा-केस' ह्या प्रकरणावरून हे उमजते कीं त्यांच्या ह्या आयुष्यांतील विचित्र दैवी अनुभवांचा धागा हा पूर्वजन्मातील कांही इच्छाशी जोडला होता. हे डॉ. स्टीव्हनसन व पुण्याच्या प्रा. व वि अकोलकर यांना वाटले.

**पूर्वजन्म संचित :**

हे भारतीय आध्यात्मिक वेदिक ज्ञानाच्या प्रवासात अगोदरच जाणले गेले आहे. भगवद गीतेतील ६ व्या अध्यायातील श्लोकांतून स्पष्ट दिसते.

अर्जुन उवाच -

''अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलित मानसः।
अप्राप्य योगसंसिद्धिं का गतिं कृष्ण गच्छति ।।३७।।

अर्जुन म्हणाला ''हे कृष्णा! श्रद्धा आहे पण अयति म्हणजे प्रकृतिस्वभावामुळे पुरेसा प्रयत्न किंवा संयमन होत नाही, म्हणून ज्याचे मन (साम्य - बुद्धीरुप कर्म) योगापासून चलित झाले, तो योगसिद्धी न पावता कोणत्या गतीला जातो?

ह्याचे सविस्तर उत्तर नंतरच्या, अं. ६ - (३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७ ह्या गीतेतील श्लोकांतून दिले आहे.

ह्या अर्जुन व कृष्ण ह्यांच्या संवादाचा मथितार्थ हा आहे की उत्तराताई या जीवात्म्याचा पुनर्जन्म अशा कुळात व अशा वेळीच (Time) झाला की त्यांच्या ब्रह्मज्ञान किंवा आत्मोद्धाराच्या अभिप्सा, ईच्छा 'Aspiration' ला पूरकतत्वाने बाळाजी हुद्दार यांच्या घराण्यात जन्म होऊन ह्या जन्मी एक योगिच साधनेचा पुरस्कार त्यांना मिळाला, असे वैयक्तिक बाळाजींच्या चरित्रावरून नक्कीच वाटेल!!

**देवतत्वाचा शोध :**

त्यांच्या 'देवताशक्तीच्या' शोधाचा प्रवास त्याच पूर्वाआयुष्यातील 'आध्यात्मिक साधनेच्या' अभ्यासाचा पुढचा अध्याय आहे. असे मानावे लागेल.

विश्वाच्या निर्मातीचा, मानवी जीवनाच्या मर्त्य व सत्य रुपाचा, चैतन्य शक्तीच्या प्रवासाचा व इतर अनेक गूढ प्रश्नांचा तलास सबंध जगात सुरूच आहे. पण, त्याच्या वेदज्ञानातून जो शोध घेतला गेला, त्याचेच शुद्ध व सामान्य स्वरूप भारताच्या सांस्कृतिक, तत्वज्ञानात्मक, रुढी, परंपरेत प्रकर्षाने दिसून येते. ह्या वेदिक शोधाचे वैशिष्ट्य जगातील इतर शोध प्रक्रियेपेक्षा अगदी निराळे व स्वतंत्र आहे. ''जीवात्मा, परमात्मा व प्रकृति'' यांच्या मूळ निर्मितीपासून किंवा ह्या 'सत्य ज्ञानाच्या' न ऋत ज्ञानाच्या संकल्पना ग्राह्य मानल्यापासून हा प्रवास आज तागायत त्या ''मूळ मार्गपद्धतीवर'' चालत आहे. तेव्हा उत्तराताईंच्या शोध घेण्याच्या पद्धतीपेक्षा, हा मार्गच त्यांना आढळलेल्या सर्व शोधपसाऱ्यातील 'मूळ सत्य मार्ग आहे. त्यांना त्याचा शोध 'मुळाक्षरे' ह्या अभ्यासाच्या पातळीचा वाटतो, हे स्वाभाविकच आहे. पण, त्यांचे पुढचे अध्याय, 'अध्यात्मज्ञान उपासना व योग, तंत्र, यंत्र ह्या प्रक्रियेतील पद्धती व त्यांची परस्पर सहकार्य पद्धती प्रमाणेच अभ्यासावे लागतील, तरच त्यांच्या देव, देवता व संलग्न प्रश्नांची खरी उत्तरे मिळतील. एरव्ही, कांही भौतिक सामान्य व कांही यौगिक, मंत्र, तंत्र ह्यांच्या बहीर्गत रुपाची दर्शनेच मिळतील सुसंगत उत्तरे सापडणार नाहीत. हे सत्य आहे!!

THE PSYCHIC BODY



This diagram indicates the position of the chakras and their related nerves.

कारण, भारतीय समाज ह्या सत्यशोधनाचा कार्यात अनेक युगे व शतके व अनेक पिढ्यांमध्ये कार्यरत आहे. अजून शोध पुरा झाला नाही. काही सत्ये प्राप्त झाली आहेत, पण गोंधळही भरपूर आहे. ह्या गोंधळातून सत्यमार्ग शिताफीने पकडावयाला लागेल.

त्यामुळे, उत्तराताईंच्या धोड्याशा विस्कळीत शोध दर्शनाच्या प्रसाराच्या पसाऱ्याच्या चारकाव्यात न शिरता मी माझे परिक्षण फक्त मला समजलेल्या मार्गाला अनुसरून

काही उत्तरे देतो. पुस्तकाच्या वर्णनापेक्षा मला हे सांगणे महत्त्वाचे वाटते.

**ह्या संदर्भात मी योगी अरविंद घोष, पाँडिचेरी, भारत यांच्या 'वेदरहस्य' ह्या पुस्तकातील निष्कर्ष सांगतो.**

''भारतात गूढवाद्यांच्या शोधानेच तत्वज्ञान वाढले व त्याने आपले आध्यात्मिक ज्ञान वाढविले व कायम ठेवले व त्यांपैकी काही पद्धती नंतरच्या आध्यात्मिक शिस्तीत व योगात कायम ठेवल्या. वेदांतील गूढ तत्वांची परंपरा ह्या ऐतिहासिक सत्याशी सुसंबद्ध आहे. वेद हा हिंदी संस्कृतीचा खंबीर पाया आहे. तो कांही केवळ अडाणी लोकांचा देवपूजेचा ग्रंथ नव्हे. तो परंपरेपेक्षाही कांहीतरी जास्त आहे. ती इतिहासातील एक प्रत्यक्ष घडलेली घटना आहे''

''वेद हा एक 'दोन अर्थ' असलेला एक बाह्य व वरवरचा आणि दुसरा आंतरिक, मानसिक, असा ग्रंथ असून उपमा ह्या अंतरिक व आध्यात्मिक अर्थाच्या निदर्शक व ज्ञानाच्या गुप्त शिकवणीचे साधन आहे.''

''गूढवाद्यांच्या शोधाचे ध्येय सत्य हे होते. आपले अंतर्गत सत्य, बाह्य वस्तूतील सत्य, जगाचे व देवांचे सत्य व सर्वच वस्तुमात्रातील मूळ सत्य हा त्यांच्या शोधाचा विषय होता'' नारदीय सूक्तातील विश्वाच्या निर्मिती अगोदरच्या स्थितीपासून पुढे जी निर्मीतीची सृजन क्रिया केली किंवा प्रत्यक्षात घडली त्याचे पूर्ण वर्णन व संकल्पना आज सत्यदर्शनाच्या पातळीवर ज्ञानी माणसांनी स्वीकारलेल्या आहेत. त्या विश्वरचनेतील प्रत्यक्ष मानव हा Spiritual Being and Becoming म्हणजे त्याच्या 'Embodied Consciousness' देहबद्ध चैतन्यशक्ती व चैतन्यशक्तीच्या उत्क्रांति लावावर बांधलेला आहे. हे उत्तरातांईना मान्य असावे असे त्यांच्या, तुटक व तुरळक संदर्भावरुन दिसते.

मग ह्या अनंतकाळाच्या शोधमार्गावर आपण सर्वच वाटचाल करत आहोत. तेव्हा, ह्या पृथ्वीवर नवीन देहात जन्म घेणाऱ्या जीवात्म्याला त्याच्या ह्या 'सत्यशोधनाच्या' मूळ अभिप्सेची (Aspiration) ची जाणीव झाली, की त्याची खरी सत्यशोधनेची व स्वतःच्या आत्मज्ञानाची व आत्मोद्धाराची वाटचाल सुरु होते. तशी ती उत्तरतांईची किंवा आपल्या सर्वांचीच कळत न कळत चालू होते व त्याचे आत्मसंस्कारात रूपांतर होते.

ह्या वाटचालीत सामील होणाऱ्या साधकाला मग प्रचलित सामाजिक, तत्त्वज्ञानातील, योगज्ञानातील व इतरमार्गातील ज्ञानप्रक्रियांच्या ज्ञानाची, साधनांची प्राप्ती होणे आवश्यक ठरते. ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे हे तो ग्रहण करतो. पण, चौकस व जागरूकतेने कोणते भौतिक ज्ञान व कोणते आध्यात्मिक हे तपासावे लागते.

**समाजाचे व राजसत्तेचे दुर्लक्ष :**

पूर्वीचा समाज ह्या ज्ञानाची जबाबदारी राजसत्ता, धर्मसत्ता, शिक्षणसंस्था यावर विसंबून ह्या प्रक्रियेला त्याच्या गृहीत अनुकूल पद्धतीत राहून सहकार्य करत होतो. आज दुर्दैवाने हे जवळजवळ उद्ध्वस्त व विकृत झाले व विरोधी झाले आहे. पण मानवजातीचा हा शोध सतत व निरंतर चालू आहे व ज्ञान, योग शास्त्रांचा जीर्णोद्धारही चालू आहे.

**पुढील प्रगती :**

तेव्हा ह्या उंबरठ्यावर किंवा चौकात आल्यावर कोणता मार्ग 'मुळाक्षरांत' सामील झालेल्या साधकाने स्वीकारला याबद्दल थोडेसे सूत्रपद्धतीने पाहू या.

पुरुषसूक्तात वर्णिलेला 'सृष्टिक्रम' (Devolution and Evolution) हा अव्यक्त जग व व्यक्त जगाची संकल्पना सांगतो व 'यज्ञ' ही ज्ञान व गुणात्मक यंत्रणा मानवामध्ये मूलगामी बदल घडवून आणणारी आहे, पण मुख्यत: त्या 'यज्ञ' संकल्पनेचा उदय सृष्टीनिर्मात्याच्या मनात झाला, हे

जाणणे महत्वाचे आहे.

मंत्रपुष्पांजलीतील मंत्र हा पुरुषसुक्तातील आहे. ऋग्वेदातील पुरुषसुक्त हे कंजिका स्वरुपांत म्हणजे वेदिक ज्ञानाच्या खजिन्याची किल्ली आहे. ''यज्ञेन यज्ञमय जन्त देवा: तानि धर्माणि प्रथमन्यासन'' 'सर्वहुत यज्ञ' ही बहुत यज्ञ संकल्पना आहे व त्यांत प्रजनन य, सृष्टियज्ञ व ज्ञानयज्ञयांच्या कल्पना सामील आहेत. 'यज्ञ'चा गहन अर्थ ऋग, यजु: साम आणि अथर्व वेदात आहे व ''अयं यज्ञो (विश्वस्य) भूवनस्य नाभि: । असे अथर्व २.१०.१४ मधील श्रुतीवचन आहे.

यज्ञाचा योगिक अर्थ 'संगतीकरण हा आहे. म्हणूनच पाणिनीने 'यज्ञ' धातूचे 'देवपूजा' 'संगतीकरण अणि 'दान' असे आध्यात्मिक परिभाषेतील अर्थ निश्चित केले आहेत. त्या विषयात इथे जास्त विश्लेषण करत नाही.

**देवता तत्व शोध :**

ह्या संकल्पना सर्वसाधारण शब्दज्ञानाने जाणल्या जाऊ शकणार नाहीत. पण, देवता ज्ञानाच्या प्राप्तीसाठी या संकल्पना जाणणे अत्यंत आवश्यक आहे.

देव व देवता ह्या संकल्पना तत्व रुपाने अव्यक्त विश्वात 'बीज' स्वरूपात आहरत असे मानल्यावर व्यक्त -जड जगात - देहबद्ध आत्म्याने शरीरात व प्रकृतित उपलब्ध असलेल्या साधन व शक्तिच्या मदतीने देवताचे, देवशक्तीचे आवाहन आपल्या विशेष यज्ञ प्रक्रियेसाठी करण्याची क्रिया जाणणे आवश्यक आहे. देवता ह्या सगुण स्वरुपांत पहाण्याची सवय झालेल्या मानवी समाजाला या मूळाक्षराच्या वर्णनात्मक ज्ञानापासून त्या देवता शक्तिच्या आवाहनाच्या योगिक साधन संकल्पनेशी जाणावे ती तपस्या करुन प्राप्त करणे आवश्यक आहे.

'देवतातत्व' हे अतिशय 'सूक्ष्म तत्व' आहे असे अहिताग्नी नाना काळे हे आपल्या ''श्रौत यज्ञातील देवता ध्यान विचार'' ह्या लेखात म्हणतात. (पत्ता: श्री योगीराज वेद विज्ञान आश्रम, मु. कासारवाडी, बार्शी, जि. सोलापूर, महाराष्ट्र, भारत, इंडिया)

ते पुढे म्हणतात की, 'महर्षी शौनक हे देवतेचे ज्ञान आवश्यक असल्याचे सांगून अशा यथार्थ ज्ञानाशिवाय केलेल्या लौकिक अथवा वैदिक कर्मानुष्ठानीचे,संस्काराचे इष्ट प्राप्त होणारच नाही,'' असे आग्रहाने प्रतिपादन करतात.

''नहि कश्चिदविज्ञाय यथातथ्यने दैवतम् ।
लौक्यानां वैदिकानां वा कर्मणा फलमश्नुते ।।४।।
बृहदेवता

''आधाराच्या बरोबरच अनाधाराच्या रूपात आत्मतत्वाला आपल्याच आत्म्यामधे जाणून जो देवताना जाणतो त्याने संधि व ऋचा या दोन्हीवरही दृष्टी (लक्ष) ठेवून (मंत्रांचा - ऋचांचा) पाठ उच्चारण केले पाहिजे. अशी व्यक्ति अमर, अनन्त, सत् अशा 'ब्रह्म तत्वामध्ये प्रवेश करते ।।१४०।। बृहदेवता छांदोग्य उपनिषत् ब्राह्मणाच्या खंड १०-११ प्रपाठक २ मध्ये ऋत्विजानी दैवत विज्ञान जाणण्याच्या महत्वाची कथा आली आहे. उपस्ति चाक्रायण - ऋषि एका राजाच्या यज्ञात गेले असतां त्यांनी प्रस्तोत्याला, उद्गात्याला, प्रतिहर्त्याला तुम्हाला यज्ञातील देवतांचे विज्ञान माहित आहे काय? असा प्रश्न विचारला असता. त्यानी आम्हास काहीही ज्ञान नाही'' असे तिघानीही उत्तर दिले.

(उत्तरार्ध जुलै २०१२)

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

•••

# डॉ. सौ. मानसी देशमुख यांची मुलाखत


*मानसशास्त्रातील अध्ययन अक्षमतांच्या मोजणीचे प्रमाण शोधून काढणाऱ्या संशोधिका डॉ. सौ. मानसी यांची ही मुलाखत. पुणे विद्यापीठातर्फे गेल्या ऑक्टोबरमध्ये त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली – संपादक*

**१) संशोधनांचा नेमका विषय व त्याचे स्वरूप काय होते? विषय आपल्याला सुचण्याचे कारण काय?**

'अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या भावनिक आणि वर्तणूक समस्यांचा अभ्यास आणि या मुलांचा 'बुद्ध्यंक' असा माझा संशोधनाचा विषय होता. काही मुलांना शालेय अभ्यासात कमी गुण मिळतात, पण या कमी गुणांचा त्यांच्या बुद्ध्यंकाशी तसा संबंध नसतो, कारण त्याचा बुद्ध्यंक हा सामान्य बुद्धिमत्ता किंवा कधी कधी सामान्याहून आधिक बुद्धिमत्ता या वर्गात मोडणारा असतो. या बुद्ध्यंकातील आणि त्यांना मिळणाऱ्या शालेय अध्ययनातील गुण या मधील लक्षणीय तफावत ही मेंदूतील चुकीच्या रासायनिक प्रक्रियेमुळे आढळते. आणि मग अध्ययन अक्षमता (डीसलेक्सिया) या विकाराने या मुलांचे आयुष्य हे एक आव्हान बनते. शाळेत फळ्यावर लिहिलेली अक्षरं, आकडे हे सगळेच जणू यांच्यासाठी उलटे, आरशात जशी प्रतिमा दिसते तसे दिसायला लागतात. पालक, शिक्षक यांना या मुलांना बाकीच्या वर्गातील मुलांबरोबर हाताळणे अवघड जाते. यामुळेच या मुलांना आळशी, लक्ष न देणारा, वेंधळा अशा प्रकारची अनेक नकारात्मक लेबले जोडली जातात, आणि मग औदासीन्य, आत्मविश्वासाचा अभाव, एकटेपणा, भीती यांसारख्या भावनांचा मुक्त संचार यांच्या आयुष्यात होतो. या सगळ्यांवर जर वेळीच उपचार झाले नाहीत, तर या कळीचे फूल फुलायच्या आतचं कोमेजून जाते.

जहांगीर हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ म्हणून काम करत असताना अशा कितीतरी मुलांवर उपचार करताना बरेच काम केले. प्रत्येक मुलाची 'केस स्टडी' बनवून अभ्यास केला आणि कुठेतरी आपण या मुलांवर पुढे आधिक संशोधन करावे, त्यांच्या पालकांना योग्य ती उपचारात्मक पद्धती द्यावी असे मनात आले, आणि त्यातूनच पुणे विद्यापीठाकडे माझ्या संशोधनाचा आराखडा मांडला. ज्ञानप्रबोधिनीतील प्रज्ञा – मानस संशोधिकेच्या डॉ. वनिता पटवर्धन यांनी मला या विषयासाठी पी. एच. डी. गाईड म्हणून मार्गदर्शन केले.

माझ्या अभ्यासाचे स्वरूप हे मुख्यत: अध्ययन अक्षमतेने ग्रासलेल्या मुलांच्या भावनांचा वेध घेण्यासाठी भावनांची तीव्रता मोजणारी रेटींग स्केल, प्रमाणपद्धत, विकसित करणे हा होता.



**२) या विषयावर जगात आजवर किती काम झाले आहे व त्या दृष्टीने तुमच्या संशोधनाचे महत्त्व काय?**

अध्ययन अक्षमतेवर आजतागायत अनेक शास्त्रीय कलिकांतून विविध शोध लावले गेले त्यांची माहिती आहे. जर्नल आफ लर्निंग डीसअँबीलिटीज् यांतून अनेक विषय, म्हणजेच या मुलांचा बुद्ध्यंक, त्यांच्यावर केलेले वेगवेगळे उपचारात्मक प्रयत्न, यांतून त्या मुलांना झालेला फायदा, वेगळ्या शिकवण्याच्या पद्धती, या समस्येचे निदान या

समस्येभोवती फिरणारे सामाजिक, भावनिक प्रश्न असे वेगवेगळे विषय संशोधनातून हाताळले आहेत.

भारतातदेखील गेल्या दोन दशकांत अध्ययन अक्षमतेवर अनेक संस्थांनी, हॉस्पिटलस्नी संशोधन केले आहे, पण आत्तापर्यंत या मुलांच्या भावनिक समस्यांची तीव्रता मोजणारे परिमाण विकसित केले गेले नव्हते. अशा प्रकारचे परिमाण विकसित करण्यात मला मिळालेले यश हे संशोधनाचे महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आता हे परिणाम वापरता येणार आहेत. त्यामुळे टॅंजिबल (मोजण्यायोग्य) होणार आहे.

**३) संशोधनासाठी पद्धत कोणती वापरली?**

संशोधनासाठी वेगवेगळ्या शास्त्रीय पद्धती वापरून माहिती मिळवली. या मुलांच्या आई-वडिलांबरोबर, शिक्षकांबरोबर मुलाखतीचे तंत्र वापरले, समव्ययात्मक पद्धती वापरली. भावनिक समस्येच्या प्रमाणासाठी परीक्षण, पुनर्परीक्षण विश्वसनीयता बघितली. १२० मुलांचा डेटा अभ्यासासाठी मिळवला.

**४) लहान मुलांचा अभ्यास व त्यांची समज या विषयात तुमच्या संशोधनामुळे काय फरक पडणे अपेक्षित आहे?**

'अभ्यास हा मित्र बनवा' अभ्यास करण्याचे मुलांना दडपण येऊ नये असा माझा दृष्टिकोन आहे. आणि जर अभ्यासात त्यांना काही विषयांचे आकलन होत नसेल, तर ते आकलन त्यांना वेगळ्या वेगळ्या उपचारात्मक प्रणालीने उपलब्ध करून देणे की जेणेकरुन त्यांची अभ्यासातील समज वाढेल. उदा. फ्लॅशकार्डचा वापर पंचेंद्रियातून शिक्षण काही अवधान, एकाग्रता, बुद्धी, खेळ बनला. प्रत्येक मुलाची आकलन शक्ती वेगवेगळी असते. ज्याच्या त्याच्या बुद्ध्यंकाप्रमाणे, आकलनाप्रमाणे या मुलांना जर योग्य वेळी आणि योग्य दिशेने सातत्याने असे प्रभावी उपाय मिळाले तर नक्कीच अभ्यास किंवा न आवडणारा विषय मुलांचा मित्र बनू शकेल आणि हाच मोठा फरक या संशोधनामुळे शक्य आहे.

**५) यानंतर या विषयावर संशोधनोत्तर संशोधन चालू ठेवणार आहात का?**

हो, नक्कीच संशोधन ही एक न संपणारी प्रक्रिया आहे. एका संशोधनातून जरी काही सिद्धांत मिळाले असले तरी त्यातूनच पुढे काही वेगळे सिद्धांत वेगळे पुढे येतात. माझ्या या संशोधनातून मिळालेल्या Emotional Rating Scale वर पुढे काम करण्याचा माझा मानस आहे आणि त्या दृष्टीने मी संशोधन चालू ठेवणार आहे.

**६) आपल्या प्रबंधाचे मराठीत पुस्तक करायचा काही विचार आहे का?**

हो योग आला तर नक्कीच काढायचे आहे. त्या निमित्ताने डॉ. वनितातार्इंचे गुरुऋण फेडले जाईल, माझ्या पपांची एक इच्छा पूर्ण झाली आता दुसरीही झाली तर पितृऋणातून काही अंशी मुक्त होईन.

**७) श्रेय हे नेहमी काम करणाराचे असते, पण इतरांचे प्रोत्साहन, आशीर्वाद सदिच्छा यांचे पाठबळ असावे लागते या दृष्टीने आपला अनुभव?**

वनितातार्इंचे मार्गदर्शन, लहानपणापासून मी डॉक्टरेट करावी अशी इच्छा असणारे माझे पपा, आई आजी संसाराच्या कडेवरती कसरत करताना माझ्या बरोबर असलेला सलिल, जो माझा साथीदारच नाही तर सर्वच आहे व माझी मुलगी, या सर्वांचे पाठबळ होते.

याशिवाय डॉ. अनुराधा सोवनी मॅडम, डॉ. आनंद नाडकर्णी काका आणि खूप मंडळी आहेत. तेव्हा हे श्रेय या सर्वांचे आहे, माझे काही असेलच तर मी निमित्तमात्र ठरले.

– शब्दांकन सौ. प्रणाली सोहोनी
ठाणे

●●●

आयुष्यातली आव्हानं व्यक्तीला अपंग बनवण्यासाठी नसतात, तर स्वत:चा शोध घेण्यासाठी ती मदतच करतात. - बर्निस जॉन्सन रेगन

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग

➢ जानेवारी २०१२ मध्ये झालेल्या एम्.टी. एस्. परीक्षेस प्राथमिक विभागातून इ. ३ री चे एकूण ९२ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी पास झाले व खालील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.



२०१२ जानेवारी शिष्यवृत्ती विजेते विद्यार्थी व इ. ३ री एम. टी. एस. मार्गदर्शक शिक्षक.परीक्षा

१) समर्थ मनिष चौधरी - ठाणे केंद्रात ३ रा, राज्यात २३ वा

२) दिप्ती भरत सावळे - ठाणे केंद्रात ९ वी, राज्यात ४० वी

मार्च २०१२ मध्ये झालेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्राथमिक विभागातून इ. ४ थी चे ९२ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी पास झाले व १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. या शिष्यवृत्ती वर्गास सौ. धर्माधिकारी, सौ. परदेशी व सौ. मेमाणे या शिक्षिकांनी मार्गदर्शन केले.

शिष्यवृत्ती विजेत्या विद्यार्थ्यांची नावे -

१) नारायण धायवा गवस जिल्ह्यात ८ वा क्रमांक

२) यश शिवाजी साळुंखे जिल्ह्यात १४ वा क्रमांक

३) नेहा दत्तात्रय आढक जिल्ह्यात १५ वा क्रमांक

४) वेदांत सुनिल हळदणकर जिल्ह्यात १५ वा क्रमांक

५) प्रथमेश राजेंद्र अंधारे जिल्ह्यात १७ वा क्रमांक

६) हर्षला कृष्णा मोरे जिल्ह्यात १९ वा क्रमांक

७) अपूर्वा अविनाश धावडे जिल्ह्यात १९ वा क्रमांक

८) कोमल दिनेश वाघ जिल्ह्यात १९ वा क्रमांक

९) मयुरेश दिनेश पाटील जिल्ह्यात १९ वा क्रमांक

१०) नुपूर राजेश वर्वे जिल्ह्यात २० वा क्रमांक

११) मधुप्रिया चंद्रकांत कुमकर जिल्ह्यात २१ वा क्रमांक

१२) उत्कर्षा रत्नाकर कुपटे जिल्ह्यात २१ वा क्रमांक

१३) अथर्व समीर जाधव जिल्ह्यात २१ वा क्रमांक

१४) दक्षता संतोष गोखले जिल्ह्यात २१ वा क्रमांक

१५) सर्वेश महादेव सडवेलकर जिल्ह्यात २१ वा क्रमांक



पूर्व माध्यमिक इ. ४ थी शिष्यवृत्ती विजेते २०१२ विद्यार्थी - मार्गदर्शक शिक्षिका

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग

➢ आमच्या शाळेतील सहशिक्षिका सौ. सुनंदा गोतावळे यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे दि. २४ मे २०१२ रोजी अपघाती निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

➢ आमच्या शाळेचा इ. १० वी (२०११-१२) चा

निकाल ९८.२०% लागला. कु. त्रिशला प्रवीण पवार ही विद्यार्थिनी ९५.०९% गुण मिळवून शाळेत प्रथम आली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

➢ आमच्या शाळेतील मुख्य लिपिक श्री. दे. व. गवई दि. ३१ मे २०१२ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

**इ. १० वी चे पहिले दहा विद्यार्थी एकूण टक्केवारी ९८.२०%**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | इ./तु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पवार त्रिशला प्रवीण | १० अ | ९५.०९% |
| २ | हासे मंगेश सुधाकर | १० अ | ९४.३६% |
| ३ | सावंत चैताली चंद्रकांत | १० अ | ९४% |
| ४ | धोंडकर सायली दशरथ | १० अ | ९३.८२% |
| ५ | वालावलकर ऐश्वर्या राजन | १० अ | ९३.८२% |
| ६ | झाडकर मुग्धा सुधीर | १० अ | ९३.४५% |
| ७ | रसाळ सायली रघुनाथ | १० अ | ९३.०९% |
| ८ | पाटील अक्षय रावसो | १० अ | ९२.८२% |
| ९ | गावकर शिवाणी गणेश | १० अ | ९२. ३६% |
| १० | माने आकांक्षा बबन | १० अ | ९२.३६% |

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१२ च्या माध्यमिक शाळेचा परीक्षेचा निकाल :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | १४८ |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | - | १४८ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - | १४८ |
| टक्केवारी | - | १००% |
| विशेष प्राविण्य | - | १०५ |
| प्रथम श्रेणी | - | ३० |
| द्वितीय श्रेणी | - | १२ |
| तृतीय श्रेणी | - | ०१ |

| टक्के | पाच विषयातील सर्वोत्तम विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | २८ | १९ |
| ८० - ८९ | ६३ | ४३ |
| ७० - ७९ | ३० | २० |
| ६० - ६९ | १४ | ९ |
| ५० - ५९ | १० | ७ |
| ४९ च्या खाली | ३ | २ |

**पहिले दहा क्रमांक - विशेष २५ क्रीडा गुणां व्यतिरिक्त :**

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| १ | पुसाळकर नेहा | ९६.७३ |
| २ | चिखलिकर आकाश | ९६.१८ |
| ३ | शाह अमिष | ९५.२७ |
| ४ | मुळे मधुरा | ९४.७३ |
| ५ | छिद्रवार अक्षय | ९४. ५५ |
| ६ | गांगल अमय | ९४.३६ |
| ७ | करमरकर अनघा<br>प्रभुदेसाई स्नेहल | ९४.१८ |
| ८ | कलपटगी अंकिता<br>ठोसर सुश्रुत<br>बोरवणकर अनुजा | ९३.८२ |
| ९ | वडके श्रिया | ९३.६४ |
| १० | आपटे सौरभ | ९३.२७ |

विषयातील सर्वप्रथम क्रमांक

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | पुसाळकर नेहा | ९० |
| मराठी | पुसाळकर नेहा<br>ढापे सोनाली<br>चिखलिकर आकाश | ९१ |
| संस्कृत | कलघटगी अंकिता | १०० |
| हिन्दी | खाडे स्वामिनी<br>पुसाळकर नेहा<br>गोखले तेजस<br>मुके मधुरा | ८३ |
| गणित | शाह (नगदा) निशिता<br>चिखलिकर आकाश<br>गाला आयुष<br>पुसाळकर नेहा<br>जोशी श्रेया | १४७ |
| विज्ञान | गांगल अमय<br>प्रभुदेसाई स्नेहल<br>शाह अमिष | ९८ |
| समाजशास्त्र | पुसाळकर नेहा<br>चिखलिकर आकाश | ९७ |

**उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल : फेब्रुवारी २०१२**



पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तिधारक



पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तिधारक

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ७५

उत्तीर्ण विद्यार्थी - ६४

शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची नावे आणि क्रमांक (शहरी विभाग) खालील प्रमाणे

| अ. क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | शुभम पट्टेकर | १६ |
| २ | इशा पुतांबेकर | १९ |
| ३ | अदिती गोरे | २१ |
| ४ | निल अनाप | २१ |
| ५ | हर्षल वेलिंग | २१ |
| ६ | अन्मय जाधव | २२ |
| ७ | अभिषेक मोंडकर | २४ |
| ८ | संजना जोशी | २५ |
| ९ | अपूर्व पुराणिक | २६ |
| १० | कशवी गाला | २६ |
| ११ | किमया हडनिस | २६ |
| १२ | रेणुका भट | २६ |
| १३ | निकिता वेलिंग | २७ |
| १४ | शिवानी पिसाट | २७ |
| १५ | अदित्य जोशी | २८ |
| १६ | ओंकार साठे | २८ |
| १७ | गायत्री पाटील | २९ |
| १८ | स्निग्धा कुरकुले | २९ |
| १९ | हिमानी कद्रेकर | ३२ |
| २० | मैत्रेय चिपळूणकर | ३२ |

| | | |
|---|---|---|
| २१ | स्नेहल कोळंबेकर | ३२ |
| २२ | तन्वी गुणे | ३२ |
| २३ | कौस्तुभ बापट | ३३ |
| २४ | सौरभ मोरे | ३३ |
| २५ | गायत्री जागळेकर | ३४ |
| २६ | नेहा दामले | ३४ |
| २७ | राहुल सूर्यवंशी | ३४ |
| २८ | जान्हवी पाटील | ३५ |

## जोशी बेडेकर महाविद्यालय

### बारावीचा निकाल

| | बारावी वाणिज्य | बारावी कला |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | ५८९ | १८६ |
| विशेष | ५८ | २ |
| प्रथम वर्ग | २३४ | ३० |
| द्वितीय वर्ग | २१६ | ६५ |
| उत्तीर्ण वर्ग | ३९ | ३१ |
| अनुत्तीर्ण | ४२ | ६१ |
| टक्केवारी | ९२.८६% | ६७.२०% |

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

श्री. किर्तीकुमार जैन व श्री. शरद मनकुमारे यांना रसायनशास्त्राची मुंबई विद्यापीठाची पी. एच. डी. पदवी प्राप्त झाली. हे दोन्ही विद्यार्थी रसायनशास्त्र विभागाचे डॉ. एम. व्ही. रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे संशोधन करत होते.

### गांधी विचार संस्कार परीक्षा

गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांनी 'गांधी विचार संस्कार परीक्षा' यावर एक राज्यस्तरीय परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेस कनिष्ठ महाविद्यालय व पदवी महाविद्यालयाच्या मिळून एकूण ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे प्रत्येक जिल्ह्यातून तीन विजेते घोषित केले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी आपल्या महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष विज्ञान शाखेचा कु. वैभव रोकडे याला सुवर्ण पदक व कु. विद्या गोरे ही विद्यार्थिनी कांस्य पदकाची मानकरी ठरली. सौ. मंजिरी रानडे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी यासाठी उत्तम मेहनत घेतली.

### विशेष नैपुण्य

➢ प्रा. प्रकाश माळी– रसायनशास्त्र विभाग यांना श्री शनिदेव महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्था, पुणे यांच्यातर्फे श्री शनिदेव कृपा गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०१२ प्रदान करण्यात आला. तसेच मैत्री संस्था, मुंबई आयोजित राष्ट्रस्तरीय मैत्री कर्तृत्व गौरव पुरस्कार, २०१२ याचे ते मानकरी ठरले.

➢ प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्यातर्फे "Study of diversity of scarabaeid beetles in pune city and effect of some ecological parameters on the life history of protaetia aurichalcea" या विषयावर संशोधन करण्याकरिता रुपये १०००५०० अनुदान प्राप्त झाले.

➢ डॉ. सौ. पूनम कुर्वे यांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्यातर्फे "To Study season dependent variation in Biodiversity and Pollution status on the basis of insicator taxa of intertidal zone along the coastline of Alibaug, District : Raigad, Maharashtra" या विषयावर संशोधन करण्याकरिता रुपये ११८७८०० अनुदान प्राप्त झाले.

➢ श्री. राकेश वने, श्री रविंद्र शेलार, श्री. नीलेश पाटील (रसायनशास्त्र विभाग) श्री. सचिन अडिवरेकर

(जैवतंत्रज्ञान विभाग) यांनी बिर्ला महाविद्यालयातर्फे ३० एप्रिल २०१२ रोजी 'Lab Maintenance' विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत भाग घेतला.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी, बारावी, तृतीय वर्ष विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ५३ | २२१ | १८२ | १४ | ९८.१२ |
| बारावी | १३३ | ११० | ११६ | १२ | ९३.४५ |
| तृतीय वर्ष विज्ञान शाखा | - | ६९ | १११ | ०३ | ६९.७७ |
| तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | - | ३५ | १९ | ३२ | ७६.७९ |

प्रत्येक शाखेतील पहिले तीन विद्यार्थी

| क्रमांक | अकरावी | बारावी | तृतीय वर्ष विज्ञान शाखा | तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा |
|---|---|---|---|---|
| प्रथम | राहुल निर्मल मनोहर (८६.२८%) | साहिल राजेश धयाळकर (९१.३३%) | स्नेहा विजय गावडे (संख्याशास्त्र) (९३.७५%) | तिर्था भास्कर शेट्टी (७२.३२%) |
| | | निदा सरफराज खान | - | |
| द्वितीय | प्राची श्रीकांत वारूणकर (८५.४२%) | श्रुती आनंद कुलकर्णी (९०.६७%) | दिव्या नायर (संख्याशास्त्र) (९१.६३%) | योगेश नामदेव मोरे (७०.२५%) |
| | अमित रामकृष्ण साहू (८५.४२%) | - | - | - |
| तृतीय | तेजस सुधीर निफाडकर (८५.२८%) | प्रशांत सुरेश चव्हाण (९०.३३%) | श्वेता बबन झांझड (संख्याशास्त्र) (८४.२५%) | निखिल विष्णु शेट्टी (६७.२२%) |
| | - | स्टॅकी जॉन वर्डेस्कर (९०.३३%) | - | - |

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षापासून विविध विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच ॲड ऑन अभ्यासक्रम सुरू होणार आहेत.

| Sr. No. | Name of Course | Dates |
|---|---|---|
| 1 | Certificate Course in Bioinformatics | June 25-30, 2012 |
| 2 | Certificate Course in Bioinformatics | August 26-31, 2012 |
| 3 | Add on Course in Biodiversity | June 25-July 25, 2012 |
| 4 | Add on Course in Biodiversity | Sep. 15 - Oct. 15, 2012 |
| 5 | Add on Course in Biodiversity | Dec. 5-24, 2012 |

•••

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गाही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवींवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षांत सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवींच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,

**डॉ. विजय बेडेकर**

कार्याध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●